रायगड, नवी मुंबई
• वर्ष १८ • अंक १२१
www.ramprahar.com

# राम प्रहर

• मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## लाडकी बहीण योजनेच्या ई–केवायसीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ



**मुंबई :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या ज्या महिलांचे ई–केवायसी अद्याप झालेले नाही त्यांना तुर्त दिलासा देण्यात आला आहे. या योजनेच्या ई–केवायसी प्रक्रियेला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या आधी १८ नोव्हेंबरपर्यंत ई–केवायसी करणे बंधनकारक होते. निर्धारित मुदत आता वाढवण्यात आली असल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. अलीकडील नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे तसेच काही महिलांच्या पती किंवा वडिलांचे निधन झाल्यामुळे संबंधित आधार क्रमांकावर ओटीपी प्राप्त होणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत अपूर्ण ई–केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे महिलावर्गाला दिलासा मिळाला आहे.

### अंतरंग

बिबट्यांची होणार नसबंदी; केंद्र सरकारची मान्यता/२
नवी मुंबई मेट्रोत एक कोटींहून अधिक प्रवाशांची वाहतूक/६
एकही धाव न देता घेतल्या पाच विकेट्स/८

# पेण, खोपोली, कर्जत नगर परिषद निवडणुकीत महायुतीचा झंझावात

## उमेदवारांचे अर्ज दाखल; प्रमुख नेत्यांची उपस्थिती





**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवारांनी सोमवारी (दि. १७) भव्य रॅली काढून नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी आपले अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले. या वेळी भाजप महायुतीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

सर्वप्रथम महायुतीच्या उमेदवारांनी आमदार रविशेठ पाटील आणि भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत कोल्हटकर वाडा येथील गणपती मंदिरात दर्शन घेतले. या वेळी बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, येत्या नगर परिषद निवडणुकीसाठी महायुती सज्ज झाली असून आज पेणकरांनी मोठ्या संख्येने दाखविलेल्या उपस्थितीवरून विरोधकांचा सुपडा साफ होईल. पुढे ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेणला नेहमे झुकते माप देऊन मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे काम मागच्या काळात केले. यामुळे गेल्या १० वर्षांत नगराध्यक्ष प्रितम पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या विकासकामांच्या बळावर जनता आमच्या पाठीशी ठाम उभी आहे. त्यामुळे भाजप महायुतीचा विजय निश्चित आहे. **(पान २ वर..)**



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद निवडणुकीसाठी शिवसेना, भाजप, रिपाइं युतीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे आणि नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी सोमवारी (दि. १७) अर्ज दाखल केले.

या वेळी भाजप रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस प्रकाश बिनेदार, खोपोली प्रभारी सुनील घरत, खोपोली निवडणूक प्रमुख यशवंत साबळे, मनीष खवळे, रमेश रेटरेकर, इंदरमल खंडेलवाल, मितेश शहा, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजप, शिवसेना, आरपीआय महायुतीच्या नगराध्यक्षपद आणि २१ प्रभागांतील नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी आपले अर्ज सोमवारी (दि. १७) दाखल केले. या वेळी भाजप रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत





रॅली काढण्यात आली.

कर्जत शहरातील ग्रामदैवत श्री धापया महाराजांचे उपस्थित नेते, पदाधिकाऱ्यांसह उमेदवारांनी दर्शन घेतले तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मिरवणुकीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल करण्यात आले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, किरण ठाकरे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, वसंत भोईर, शिवराम बदे, अतुल बडगुजर, माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, रजनी गायकवाड, माजी उपगराध्यक्ष राहुल डाळिंबकर, रमेश मुंढे, अरविंद मोरे, लालधारी पाल आदी उपस्थित होते. महायुतीच्या वतीने नगराध्यक्षपदासाठी डॉ. स्वाती अक्षय लाड आणि २१ प्रभागातील सदस्यपदासाठी उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

## पहिला गुलाल भाजपचा!

### नगरपंचायत निवडणुकीत पॅनल बिनविरोध

**सोलापूर : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपला पहिले यश मिळाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायतीमधील सर्व १७ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. नगराध्यक्षपदासाठी दोन अर्ज आल्याने या जागेची निवडणूक होणार आहे.

अनगर नगरपंचायतीमध्ये १७ सदस्यांच्या जागांसाठी तेवढेच अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली आहे. राष्ट्रवादीमधून भाजपमध्ये दाखल झालेले माजी आमदार राजन पाटील यांनी आपले वर्चस्व दाखवून दिले आहे.

अशा पद्धतीने सर्व १७ जागा या बिनविरोध होणारी अनगर ही राज्यातील पहिलीच नगरपंचायत ठरली आहे. तिथे आता नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे.

## रायगडात नगराध्यक्षपदासाठी ५९, तर सदस्यपदांसाठी तब्बल ९०० अर्ज दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १० नगर परिषदांच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी ५९, तर नगरसेवकपदांसाठी ९०० अर्ज प्राप्त झाले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सोमवारी (दि. १७) शेवटच्या दिवशी नगरसेवकपदासाठी ५२०, तर नगराध्यक्षपदासाठी ३६ असे एका दिवसात तब्बल ५५६ अर्ज दाखल झाले. मंगळवारी अर्जांची छाननी होईल.

जिल्ह्यातील सर्व पालिकांमध्ये मिळून १०७ प्रभाग असून एकूण २१७ सदस्य निवडून द्यायचे आहेत. सुरुवातीच्या काही दिवसांत युती, आघाडीचे प्रयत्न केले जात होते. त्यामुळे अनेकांचे अर्ज विलंबाने दाखल झाले.

### आज छाननी

खोपोलीत नगरसेवकपदासाठी १८८ व नगराध्यक्षपदासाठी सात अर्ज, अलिबागेत नगरसेवक ७५ व नगराध्यक्ष सहा, श्रीवर्धन नगरसेवक ६८ व नगराध्यक्ष पाच, मुरूड–जंजिरा नगरसेवक ७४ व नगराध्यक्ष पाच, रोहा नगरसेवक ७८ व नगराध्यक्ष तीन, महाड नगरसेवक ७४ व नगराध्यक्ष सात, पेण नगरसेवक १०३ व नगराध्यक्ष पाच, उरण नगरसेवक ७८ व नगराध्यक्ष नऊ, कर्जत नगरसेवक ९२ व नगराध्यक्ष नऊ, माथेरानमध्ये नगरसेवकपदासाठी ७० व नगराध्यक्षपदासाठी चार अर्ज दाखल झाले आहेत.

दाखल झालेल्या अर्जांची छाननी मंगळवारी केली जाणार आहे, तर शुक्रवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत आहे.

## निवडक

### बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसिना यांना फाशीची शिक्षा



**ढाका :** आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्ममा खान कमाल यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. जुलै–ऑगस्ट २०२४मध्ये आरक्षणविरोधी विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या अशांतता आणि मानवतेविरुद्धच्या पाच गंभीर गुन्ह्यांसाठी त्यांना दोषी ठरवण्यात आले आहे.

### सौदी अरबमध्ये अपघातात ४२ भारतीयांचा मृत्यू

**मक्का मदिना :** सौदी अरबमधील उमराह यात्रेकरूंना मक्काहून मदिनाला घेऊन जाणारी बस आणि डिझेल टँकर यांची धडक होऊन ४२ भारतीयांचा मृत्यू झाला आहे. हा भीषण अपघात मुफ्रीहाटजवळ सोमवारी (दि. १७) पहाटे दीड वाजता झाला. मृतांपैकी बहुसंख्य जण तेलंगणातील हैदराबादचे आहेत. अपघातानंतर बसला आग लागल्याने अनेक प्रवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. अनेक जण झोपेत असल्यामुळे मोठी जीवितहानी झाली.

### श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## तरुण पिढीसाठी प्रेरणादायी उपक्रम –आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका, संस्कारभारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्रीगुरुकुलम न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला रविवारी (दि. १६) उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये परिसरातील स्पर्धकांनी मोठा सहभाग नोंदवत प्राथमिक फेरी यशस्वी केली.

या स्पर्धेच्या निमित्ताने खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयातील केंद्रावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या सुसंस्कारित वाचनकौशल्याचा अनुभव घेत उपक्रमाचे कौतुक केले. गीतेचा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला, असे त्यांनी म्हटले.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ विशेष मानाचे स्थान राखून आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिलेले गीतेतील उपदेश आजही मानवाला सत्य, कर्तव्य, धैर्य आणि आत्मज्ञानाचा मार्ग दाखवतो. या आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रवाहाला नवे तेज देण्यासाठी स्पर्धेच्या माध्यमातून काम केले जात आहे. **(पान २ वर..)**

## पनवेलच्या पाले बुद्रुकमध्ये शेकापला खिंडार!

### ज्येष्ठ नेते, सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेलमध्ये शेतकरी कामगार पक्षाला एक मोठा धक्का बसला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून पाले बुद्रुक येथील शेकापचे ज्येष्ठ नेते हिराशेठ तांडेल यांच्यासह दशरथ वास्कर, विद्यमान सरपंच निखिल तांडेल, उपसरपंच पप्पू पारधी आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. १६) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नवागतांचे स्वागत केले. या वेळी बोलताना अरुणशेठ भगत यांनी, आपण सर्वांनी एकजुटीने काम करून आपल्या भागाचा विकास करूया, असे प्रतिपादन केले.

आपल्या भाषणात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शेकापवर टीका करत म्हटले की, आधी मोठ मोठ्या घोषणा करायच्या आणि निवडणूक जवळ आली की मात्र सेटलमेंट करून मोकळे व्हायचे अशी शेकापची आजवर भूमिका राहिली आहे, पण अशा प्रकारचे राजकारण जास्त काळ चालत नाही. भाजपमध्ये काम करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाते, प्रोत्साहित केले जाते. जो विश्वास ठेवून आपण पक्षप्रवेश केला आहे तो सार्थ ठरेल, सर्वांना योग्य सन्मान दिला जाईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी नवागतांना दिली. **(पान २ वर..)**

**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल (रजि.)**
(सोसायटी अॅक्ट १८६० - क्र.४५/९२ मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० - क्र.एफ १६१७)

**वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना**
(फक्त सभासदांसाठी)

**प्रति,**
**मा. सभासद**

**महोदय,**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची **पस्तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार** दिनांक **१८ डिसेंबर २०२५** रोजी सायंकाळी **४.००** वाजता संस्थेच्या **रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे, प्लॉट नं.१, सेक्टर-१२, उलवे** येथे खालील कामांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.
गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास नियोजित वेळेच्या अर्ध्या तासानंतर तीच सभा त्याच ठिकाणी त्याच कामांचा विचार करण्यासाठी भरविण्यात येईल व अशा पुन्हा भरलेल्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
तरी आपण या सभेस अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**कामकाज पत्रिका**
१. २६ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज वृत्त वाचून कायम करणे.
२. मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयांना व केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
३. ज. भ. शि. प्र.संस्थेचे २०२४-२०२५ सालचे हिशोब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च व ताळेबंद व हिशोब तपासनिसांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
४. सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५. सन २०२५-२०२६ सालाकरीता हिशोब तपासनिसांची नेमणूक करणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

सही/-
**मा. श्री. अरूण जगन्नाथ भगत**
अध्यक्ष
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.

**ठिकाण - नवीन पनवेल**
**दिनांक - १७ नोव्हेंबर २०२५**

**टीप :** १. मा.सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील अगर प्रश्न विचारावयाचे असतील तर ते लेखी स्वरूपात सभेच्या ७ दिवस अगोदर पोहोचतील असे पाठवावेत.त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
२. ज्या सभासदांची निवासस्थाने बदलली असतील त्यांनी आपला बदललेला पत्रव्यवहाराचा पत्ता संस्थेच्या कार्यालयात कळवावा.

# रायगडात पालिका निवडणुकांची रणधुमाळी

## रोहा येथे विविध पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल; मोठी गर्दी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगरपालिकेच्या निवडणुकीत आज सोमवार दि. १७ रोजी सकाळपासून उमेदवार, पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या रॅल्या, घोषणाबाजी झालेल्या शक्तिप्रदर्शनामुळे तहसील कार्यालय परिसर अक्षरशः शहर गजबजला होता.

यंदाच्या निवडणुकीत थेट नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून वनश्री समीर शेंडगे, तर शिंदे शिवसेना गटाकडून शिल्पा अशोक धोत्रे यांनी अर्ज दाखल करताच राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. तरुण, सुशिक्षित नेतृत्वाचे हे थेट उमेदवार असल्याने दोन महिला नेत्यांमध्ये रंगणारी ही



समोरासमोरची टक्कर चांगलीच चर्चेत आली आहे.

राष्ट्रवादीच्या पॅनेलने उमेदवारी दाखल करताना जबरदस्त ताकद दाखवली. खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, अमित उकडे, समीर शेंडगे, अहमद दर्जी, राजू जैन आदी पदाधिकार्यांच्या उपस्थितीत प्रभागनिहाय उमेदवारांनी अर्ज दाखल केले, तर शिंदे गटानेही दमदार टक्कर देत शिल्पा अशोक धोत्रे यांना थेट उमेदवार म्हणून मैदानात उतरवले आहे. तालुका प्रमुख मनोज कुमार शिंदे, अशोक धोत्रे आदी नेत्यांच्या उपस्थितीत उमेदवार व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली तर

भाजपकडून प्रभाग ६ अ) ज्योती सनल कुमार प्रभाग ९ ब) रोशन चाफेकरप्रभाग १०) अ नीता घरत ब) सुमित रिझवूड हे चार उमेदवार अधिकृत पक्षाच्या चिन्हावर दाखल केले असून स्वबळावर निवडणूक लढणार असल्याचे भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी बोलताना सांगितले.

# मांडवा जेट्टी ते अलिबाग मार्गावर वाहतूक बंदी अधिसूचना जारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मांडवा जेट्टी ते अलिबाग मार्गावरील अपघात कमी होण्यासाठी तसेच स्थानिक नागरिक,विद्यार्थी व पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून मांडवा जेट्टी ते अलिबाग या मार्गावर दररोज सकाळी ०८.०० वा. ते दु. १२.०० वा.पर्यंत तसेच सायं.१६.०० ते रात्री २०.०० वा.पर्यंत या अधिसूचनेच्या दिनांकापासून ते पुढील आदेश होईपर्यंत जड अवजड वाहनांकरिता (दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जिवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना वगळून) जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूकबंदी अधिसूचना जारी केली आहे.

रायगड जिल्हा हा पर्यटक जिल्हा असल्याने अलिबाग, मांडवा, किहिम, आक्षी, नागाव येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक आपआपली वाहने घेऊन येत असतात. पर्यटकांची वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. मांडवा जेट्टी ते अलिबाग हा रस्ता अरुंद असून या मार्गावर मोठ्या प्रमाणात डंपर व ट्रक मातीची/खडीची वाहतूक करणारी वाहने व सिमेंट कॉन्क्रीटीकरणाकरीता सिमेंट मिक्सर, इतर सामनांची वाहतूक करणारे अवजड वाहने जात येत असतात. त्यातच मांडवा जेट्टी येथे जलप्रवासी वाहतूक बोटी तसेच रो-रो सेवा सुरु असल्याने त्यामधून देखील मुंबई येथून पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वाहने येत असतात. त्यामुळे मांडवा जेट्टी हा रस्ता अरुंद असल्यामूळे वाहतुक कोंडी होऊन या मार्गावर नेहमी किरकोळ, गंभीर व प्राणांतिक अपघात होत असून या अपघातांमध्ये वाढ होत आहे. तसेच दर शनिवार व रविवार या दिवशी मुंबई येथून पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून विद्यार्थी तसेच पर्यटकांना प्रवासाकरीता जास्तीचा वेळ लागतो. तसेच आजारी रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका या वाहतूक कोंडीमध्ये अडकून पडल्याने रुग्णाच्या जिवितास धोका संभावू शकतो.

ही वाहतूक बंदी अधिसूचना ही दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जिवनावश्यक वस्तू वाहन नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहीका यांना लागू राहणार नाही.

# खोपोलीत अर्ज दाखल करताना उमेदवारांसह कार्यकर्त्यांची दमछाक

**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने नामनिर्देशन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नगरपरिषद कार्यालयात व कार्यालया बाहेर इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी प्रचंड प्रमाणात गर्दी केल्याने, अखेर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस विभागाला पाचारण करावे लागले.

नामनिर्देशन दाखल करण्याची आजच्या शेवटच्या दिवशी सर्वच इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांची धावपळ पहावयास मिळाली. कालपर्यंत राजकीय पक्षांचे उमेदवार ठरले नव्हते, तिकीट वाटप करताना राजकीय पक्षांच्या हाय कमांडला घाम फुटला, कारण अनेक निष्ठावंतांना डावल्याने त्यांनी दुसऱ्या पक्षाचा किंवा अपक्ष नामनिर्देशन दाखल करण्यासाठी पाऊल उचलावे लागले.

ऑनलाइन नामनिर्देशन दाखल करताना अडचणी येत असल्याने अखेर ऑफलाइन सुद्धा फॉर्म स्वीकारण्याची प्रशासनाने व्यवस्था केली होती. इच्छुक उमेदवारांची प्रचंड प्रमाणात भाऊ गर्दी असल्याने प्रशासनाला तीन नंतरही फॉर्म स्वीकारताना दमछाप झालेली पहावयास मिळाली.

प्रांताधिकारी व मुख्य निवडणूक अधिकारी संकपाळ, सहाय्यक निवडणूक अधिकारी पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारी दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली.

नगरपरिषद कार्यालय बाहेर इच्छुक उमेदवारांच्या समर्थकांनी प्रचंड गर्दी केली होती मोठ्या प्रमाणात वाहने आणण्यात आल्याने. त्रास होउ नये म्हणुन पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## मुरुडमध्ये नगराध्यक्षपदाकरिता भाजपच्या शरयु भगत यांचा अर्ज दाखल



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक करिता शेवटच्या दिवशी थेट नगराध्यक्षा पदाकरीता २ तर नगरसेवक पदासाठी २१ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

भाजप पक्षांकडून नगराध्यक्षा पदाकरीता शरयु विनोद भगत तर शिवसेना पक्षांकडून स्नेहा किशोर पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार-आदेश डफल यांच्या कडे सुपुर्त करण्यात आला.

मुरुड जंजिरा नगरपरिषद करिता१नगराध्यक्षा पदाकरीता ५ उमेदवार तर २० नगरसेवकांसाठी ७४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून उद्या उमेदवारी सकाळी ११ वाजता नगरपरिषद सभागृहात अर्जांची छाननी आहे.

# बिबट्यांची होणार नसबंदी

**पुणे : प्रतिनिधी**

बिबट्याच्या नसबंदीसाठी केंद्र सरकारकडून परवानगी मिळाल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. पुणे शहरातील वनविभागाच्या मुख्यालयात त्यांनी अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

**केंद्र सरकारने दिली मान्यता**

वनमंत्री नाईक यांनी सोमवारी (दि. १७) सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत पुण्यातील वनविभागाच्या मुख्यालयात बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वाढत्या हल्ल्यांबाबत आढवा बैठक घेतली. यात पुणे,अहिल्यानगर आणि नाशिक विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी मंत्री नाईक यांनी अधिकाऱ्यांना बिबट्यांच्या हल्यात जीवित हानी रोखण्यासाठी काय करावे यासाठी कृती आराखडा दिला.

बिबटप्रवण क्षेत्रात आता शेळ्या सोडण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, ज्यामुळे मानवी वस्तीवरील हल्ले कमी होतील. मात्र जेथे बिबट नियंत्रणातच येत नसेल तेथे त्याला तेथेच गोळ्या घालण्याचे आदेश आहे. या बाबी वनमंत्र्यांनी या वेळी बोलताना सांगितल्या.

# राज्यात कुष्ठरोग आता नोटिफायबल डिसीज

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य सरकारने कुष्ठरोगाला नोटिफायबल डिसीज म्हणून घोषित केले आहे परिणामी राज्यातील सर्व डॉक्टरांना कुष्ठरोगाचे निदान झालेल्या रुग्णांची नोंद दोन आठवड्याच्या आत आरोग्य विभागाकडे करणे बंदरकारक असणार आहे. राज्यात कुष्ठरोगाचा प्रादुर्भाव रोखणे आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावे त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.



कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टरियम लेप्रे या जंतूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. त्वचा परिघीय नसा, डोळे आणि अन्य अवयवावर त्याचा परिणाम होतो या आजाराबद्दल अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव दिसून येतो.`. त्यामुळे वेळेत निदान आणि औषधोपचार हे कुष्ठरोग नियंत्रणाचे प्रमुख उपाय असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.

राज्य शासनाने २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये संसर्गाची साखळी पूर्णपणे तोडणे, प्रसार शून्यावर आणणे, मुलांमधील विकृतीचे प्रमाण शून्य करणे आणि कुष्ठरोगाविषयी समाजातील भेदभाव नष्ट करणे या बाबींचा समावेश आहे. कुष्ठरोग नियंत्रणासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील सर्व डॉक्टर पॅथॉलॉजिस्ट सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ आरोग्य कर्मचारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांनी निधान झालेल्या सर्व रुग्णांचा योग्य उपचार, पाठपुरावा तसेच त्यांच्या संपर्कातील व्यक्तींना संसर्ग होऊ नये म्हणून उपचार देणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यामध्ये ३९० कुष्ठरुग्ण औषध उपचाराखाली आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना कुष्ठरोग निदान व नोंदणी संबंधीच्या नियमांचे पालन करावे अशा सूचना दिल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, कुष्ठरोग सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ.प्राची नेऊळकर यांनी नागरिकांना ही कुष्ठरोगाबाबतलक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्कसाधावा असे आवाहन केले आहे.

# बायोसायन्सेस-टेक्नॉलॉजी संशोधन व इनक्युबेशन लॅबसाठी सामंजस्य करार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे आणि बायोएरा लाइफ सायन्सेस प्रा. लि., पुणे यांच्यात अत्याधुनिक 'स्टेट-ऑफ-द-आर्ट बायोसायन्सेस अँड टेक्नॉलॉजी रिसर्च-इन्क्युबेशन लॅब' स्थापन करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, मुंबई येथे विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्रा. कारभारी काळे आणि बायोएरा चे कॉर्पोरेट डायरेक्टर सिद्धार्थ सालुंके राज्यातील विविध विद्यापीठांचे कुलगुरू आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

'स्टेट-ऑफ-द-आर्ट बायोसायन्सेस अँड टेक्नॉलॉजी रिसर्च-इन्क्युबेशन लॅब'ही राज्यातील पहिल्यांदाच उभी राहणारी नाविन्यपूर्ण इनोव्हेशन हब ठरणार असून शिक्षण-संशोधन-उद्योग क्षेत्रातील दरी भरून काढण्यासाठीडिझाइन करण्यात आली आहे. येथे अत्याधुनिक संशोधन, स्टार्टअप इनक्युबेशन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तंत्रज्ञानाचे व्यावसायिकीकरण आणि जागतिक आदान-प्रदानाची संधी उपलब्ध होणार आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थी, संशोधक आणि स्टार्टअप टीमना संधी मिळेल

पान १ वरुन

## पेणमध्ये महायुतीचा झंझावात

या वेळी खासदार धैर्यशील पाटील यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, महायुतीच्या रॅलीला पेणच्या जनतेने दिलल्या प्रतिसादावरून २४ नगरसेवक व एक नगराध्यक्ष असे महायुतीचे २५ उमेवार निवडून येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. प्रत्येक इच्छुक उमेदवाराची निवडणूक लढण्याची इच्छा असते. ज्यांनी बंडखोरी केली त्यांना विश्वासात घेण्याचे काम आम्ही करीत असून राजकारणात तोडायचे नसते, तर जोडायचे असते ही भूमिका आमची असणार आहे.

नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रितम पाटील यांनी सांगितले की, आज माझ्यासह सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून पेणची जनता मतरूपी आशीर्वाद आम्हाला देईल. गेली अनेक वर्षे आमदार रविशेठ पाटील, खासदार धैर्यशील पाटील, खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली पेणमध्ये सातत्यपूर्ण केलेली विकासकामे व पुढे अशीच कामे करण्याचा आमचा अजेंडा आहे, असेही त्यांनी म्हटले. या वेळी महायुतीच्या भव्य रॅलीमुळे पेणमधील वातावरण महायुतीमय झाल्याचे दिसून आले.

## तरुण पिढीसाठी प्रेरणादायी उपक्रम -आमदार प्रशांत ठाकूर

ही स्पर्धा केवळ श्लोक पठणाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात संस्कारांची पेरणी करण्याचा एक सुंदर प्रयत्न आहे. योग्य उच्चारण, छंद, लय आणि भावपूर्ण अभिव्यक्तीद्वारे गीतेचे श्लोक सादर करताना एकाग्रता, स्मरणशक्ती आणि मानसशांती विकसित होते. गीता पठण हे प्राचीन भारतीय वाङ्मयातील संगीतात्मक परंपरेचाही एक भाग आहे. श्लोकांच्या ध्वनीत एक विशिष्ट लय असते, जी मनाला स्थिर ठेवते. त्यामुळे स्पर्धेची तयारी करताना केवळ श्लोक पाठ होतात असे नाही; तर त्यांना संस्कृत भाषेचे सौंदर्य, तिचे व्याकरण आणि ध्वनी माधुर्य यांचाही परिचय होतो. त्यांची भाषिक आणि बौद्धिक प्रगती अधिक दृढ होते. म्हणून श्रीमद्भगवद्गीतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेली श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धा प्राथिमक फेरी शालेय आणि खुला अशा दोन गटांमध्ये झाली. यामध्ये ३०हून अधिक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शालेय गटातील स्पर्धा पनवेलमधील गुजराती शाळा, नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालय आणि कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे; तर खुला गटातील फेरी खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयातील केंद्रावर झाली.

प्राथमिक फेरीवेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, गुरुकुलम न्यास अध्यक्ष मंजिरी फडके, संस्कृत भारतीच्या अनया करंदीकर, श्रीमती टिळक, योगेश पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष चिन्मय समेळ, अमित चव्हाण, वैभव बुवा, शामनाथ पुंडे, कौस्तुभ सोमण आदी उपस्थित होते.

या प्राथमिक फेरीनंतर लवकरच अंतिम फेरी होणार आहे. त्यामध्ये प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार असून विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

## पनवेलच्या पाले बुद्रुकमध्ये शेकापला खिंडार!

पक्षप्रवेश कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, एकनाथ देशेकर, भाजपचे पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, प्रकाश खैरे, कृष्णाशेठ पाटील, बुधाजी मोरावकर, दीपक उलवेकर, माजी सरपंच कमला देशेकर, अविनाश उलवेकर, सदस्य लक्ष्मण उलवेकर, शिवराम उलवेकर, नाथाशेठ आगलावे, जनार्दन आगलावे, माजी उपसरपंच कुसूम उलवेकर, सविता उलवेकर, अंकुश पाटील, अरविंद गोंधळी, भास्कर आगलावे, योगेश आगलावे, चंद्रकांत गोंधळी, माजी सदस्य प्रमोद भोपी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते हिराशेठ तांडेल, दशरथ वास्कर, वासुदेव तांडेल, बाळाराम पवार, रघुनाथ तांडेल, प्रभाकर तांडेल, पांडुरंग फडके, सरपंच निखिल तांडेल, उपसरपंच पप्पू पारधी, माजी सरपंच दिलीप वास्कर, माजी सदस्य सोमनाथ पारधी, प्रशांत पवार, महेश पवार, अजय पवार, मुका पारधी, रामा भगत, धर्मा भगत, अंकुश पारधी, भुऱ्या भगत, सुरेश तांडेल, मोहन बारशे, त्रिंबक तांडेल, मनोहर तांडेल, रवींद्र तांडेल, गुरूनाथ तांडेल, गुरूनाथ उलवेकर, दर्शना पवार, प्रिती पवार, शुभदा पवार, मनिका पवार, गंगुबाई पारधी, सुमन पवार, तुषार तांडेल, नितेश पवार, ज्येष्ठ कार्यकर्ते रामा भगत, अंबी भगत, अनंता भगत यांच्यासह पाले बुद्रुक, फणसवाडी आणि कोळवाडीमधील शेकापच्या अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन उत्साहात

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवार, दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता आशिष शेलार यांच्या हस्ते आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि विश्वस्त राही भिडे, अजय वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत अतिशय कौटुंबिक वातावरणात उत्साहात संपन्न झाले.

महाराष्ट्राला दर्जेदार दिवाळी अंकांची परंपरा आहे. ही परंपरा सातत्याने जपण्याचे कार्य मुंबई मराठी पत्रकार संघ अतिशय चांगल्या प्रकारे करीत आहे. दिवाळी अंक प्रदर्शनात उत्तमोत्तम अंक आपल्याला इथे पहायला मिळतात, अशा शुभेच्छा यावेळी आशिष शेलार यांनी दिल्या. मुंबई मराठी पत्रकार संघाचा पत्रकार दर्पण हा दीपावली विशेषांक सुद्धा अत्यंत दर्जेदार असल्याची प्रशंसा त्यांनी केली. हे प्रदर्शन मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सकाळी ११ ते संध्याकाळी ८ या कालावधीत साहित्यप्रेमींसाठी खुले असेल.

# थंडीची चाहूल लागताच तळ्यात मेंढपाळांचे आगमन



**तळा : प्रतिनिधी**

थंडीची चाहूल लागण्यास सुरूवात झाली की घाटमाथ्यावरील मेंढपाळ मेंढ्यांना घेऊन आपला मोर्चा कोकणाकडे वळवतात. या कालावधीत कोकणात मेंढ्यांसाठीचा आवश्यक पालापाचोळा चारा जंगलात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतो. त्यामुळे मेंढ्याचे चांगल्या प्रकारे पालन पोषण उन्हाळा येईपर्यंतकरता येत असल्याने मेंढ्याचे संरक्षणही चांगले होत असते

त्यामुळे हे मेंढपाळ मजल दर मजल करत कोकणातील भागात येत असून ते आता तळा तालुक्यातआले आहेत .कोकण भागात मेंढ्या घेऊन हे गरीब गरजू मेंढपाळ आपल्या मेंढ्या शेतकरयांच्या शेतात काही ठराविक दिवस बसवितात. त्या मोबदल्यात मेंढपाळांना तांदूळ अथवा ठराविक रक्कम दिली जाते अशाप्रकारेआठवडा दोन आठवडे एका एका शेतात रात्री या मेंढ्या बसविण्यात येऊन त्या मेंढ्याचे मळमुत्र त्या शेतात पडून शेतीचा कस वाढून शेतीचे उत्पन्न वाढते.

अशा प्रकारे मेंढपाळ शेतकऱ्यांच्या शेतात मेंढ्या बसवून पुढे वेगवेगळ्या गावात आपला प्रवास घाटमाथ्यावरपुन्हा जाईपर्यंत करत असतात.हे मेंढपाळ अशा प्रकारे मेंढ्याची व स्वतः ची उपजीविका भागवतात मार्च, एप्रिल, मे महिन्यामध्ये आपल्या घरी परतात.

## 'रयतमध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालकांच्या समन्वयातून आधुनिक तंत्रज्ञानाचा जागर'

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थी शिक्षक व पालकांच्या समन्वयातून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जागर होतो आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे यांनी केले.



गुणवत्तेला प्राधान्य देत माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साथीने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी रयत शिक्षण संस्था कटिबद्ध असून ज्ञानसाधनेसह विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांनाही वाव देण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी दोन सत्रांमध्ये संपन्न झालेल्या या प्रशिक्षण वर्गास गव्हाण शाखेसह रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील मार्केट यार्ड पनवेल, उलवे व न्हावे तर दुपार सत्रात दापोली पारगाव, पळस्पे, वावर्ले व करंजा अशा एकूण आठ शाखांमधीलसुमारे १२५पेक्षा अधिक शिक्षक व मुख्याध्यापक सहभागी झाले. प्रशिक्षक शुभम कुबल यांनी शिक्षक व मुख्याध्यापक यांना प्रशिक्षण दिले.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व न्हावे शाखेचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे आणि ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांचेसह १२५ पेक्षा अधिक शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.

# निवडक

## दुचाकीचोरीचा पर्दाफाश

**पनवेल :** तळोजा वाहतूक पोलिसांनी नाकाबंदीच्या वेळी दुचाकीचोरीचा पर्दाफाश केला आहे. या वेळी वाहतूक पोलिसांनी मूळ मालकाचा शोध लावून दुचाकीमालक ओंकार गायकवाड यांना ताब्यात देण्यात आली. तळोजा वाहतूक पोलिस हवालदार डावकरे, पोलीस शिपाई देवकते सिग्नल येथे वाहतुकीचे नियमन करीत होते. याचवेळी पनवेलच्या दिशेने निघालेल्या दुचाकीवरील पाठीमागे बसलेल्या व्यक्तीच्या हालचाली पोलिसांना संशयास्पद वाटल्या होत्या. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी दुचाकीचालकांना थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र दोघे गाडी जागेवरच सोडून पळून गेले. या वेळी वाहतूक पोलिसांनी मूळ मालकाचा शोध लावून दुचाकीमालक ओंकार गायकवाड यांना तळोजा येथे कारवाईसाठी देण्यात आली.

## आसुडगाव येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** मार्केटमध्ये कामासाठी लागणारे कपडे घेऊन



येतो असे सांगून आसुडगाव येथून घराबाहेर पडलेला २० वर्षीय तरुण परत घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार खान्देश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रवींद्र मुन्नालाल रजक असे या तरुणाचे नाव असून त्याची उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे मध्यम, केस काळे वाढलेले, अंगाने मध्यम तसेच अंगात लाल टीशर्ट काळी पॅन्ट घातलेली आहे. या तरुणाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पोलीस हवालदार हिरालाल शेलार किंवा खांदेश्वर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अध्यक्षपदी जगदीश तांडेल

**उरण :** तालूका दैनिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार, दै. लोकसत्ताचे उरण प्रतिनिधी जगदीश तांडेल यांची निवड करण्यात आली, तर सचिवपदी ज्येष्ठ पत्रकार दै. सामना व लोकमतचे प्रतिनिधी मधुकर ठाकूर व उपाध्यक्ष म्हणून दै. रामप्रहरचे दिनेश पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या वेळी मावळते अध्यक्ष दैनिक पुण्यनगरीचे उरण प्रतिनिधी जीवन केणी दै. कृषिवलचे दत्तात्रेय म्हात्रे, सुनील ठाकूर व मनोज पाटील आदी उपस्थित होते.



# घरफोडी करणारे सराईत गजाआड

## पनवेल तालुका पोलिसांनी चोरीचा माल केला हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल व आजूबाजूचे परिसरात विविध ठिकाणी घरफोडी चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून चोरीचा माल हस्तगत केला आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत भिंगारवाडी येथील बिअर शॉपमध्ये चोरीची घटना घडली होती. या गुन्ह्याची नोंद होताच पोलिसांच्या पथकाने गोपनिय माहिती प्राप्त करून तसेच तांत्रीक तपासाद्वारे आरोपी नामे सुदाम भगवान वाघे (वय २६) व



विधीसंघर्षग्रस्त बालक यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न करून त्यांना पनवेल परिसरातून अटक करण्यात आली आहे.

आरोपीकडे करण्यात आलेल्या तपासादरम्यान त्याचेकडून दोन मोबाईल, एक मोबाईल चार्जर, गुन्ह्यामध्ये वापरलेली मोटरसायकल, गुन्हा करतांना सीसीटीव्ही फूटेजमध्ये दिसत असलेले त्यांचे अंगावरील कपडे व २९ हजार रोख रक्कम असा एकूण ६५ हजार तीनशे रुपये किमतीचा माल हस्तगत केला आहे. संबंधित गुन्हेगारांवर पनवेल तालूका पोलीस ठाणे, खालापूर पोलीस ठाणे आणि रसायनी पोलीस ठाण्यात विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

या गुन्ह्यासाठी पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, उपायुक्त, परिमंडळ ३, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, उपनिरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विजय देवरे, हवालदार महेश धुमाळ, सुनिल कुदळे, सतिश तांडेल, शिवाजी बाबर, भुषण म्हारसे, शिपाई आकाश भगत, भिमराव खताळ आदींचे पथक नेमण्यात आले होते.

# चोरीची दुचाकी पनवेल स्टेशन रस्त्यावर सापडली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या व्यापारी संकुलामध्ये उभी केलेली दुचाकी रविवारी सकाळी चोरी झाल्यानंतर काही तासांत ही दुचाकी पनवेल रेल्वेस्थानकाजवळील रस्त्यावर अनोळखी चोरट्याने उभी केलेली सापडली. वाहन चोरांच्या या नव्या शक्कली मागील सूत्रधाराचा शोध पनवेल शहर पोलीस घेत आहेत. यापूर्वीही चोरीची दुचाकी या रस्त्यावर सापडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पनवेल शहरातील रहिवासी आणि महापालिकेतील एक कर्मचारी यांना प्रशिक्षणाच्या कामासाठी पनवेल शहरात नेमल्यामुळे रविवारी सकाळी त्यांनी त्यांची दुचाकी फडके नाट्यगृहाच्या शेजारील व्यापारी संकुलाच्या वाहनतळात उभी करून ते कामावर निघून गेले. दुपारी सव्वा वाजता पुन्हा दुचाकीकडे आल्यावर त्यांना दुचाकी सापडली नाही. त्यामुळे त्यांनी सर्वत्र शोधाशोध केली, मात्र दुचाकी न सापडल्याने त्यांनी थेट पोलीस ठाणे गाठले.

शहरात वाहनचोरीचे प्रकार वाढल्याने वाहनांची सूरक्षा हा महत्त्वाचा मुद्दा रहिवाशांसाठी बनला आहे. चोरट्यांनी मात्र यावेळी महापालिकेच्या व्यापारी संकुलातील वाहनाला लक्ष्य केल्यामुळे महापालिकेच्या व्यापारी संकुलाची सूरक्षा सुद्धा ऐरणीवर आली आहे. रविवारी चोरीस गेलेल्या दुचाकीचा शोध पनवेल रेल्वे स्थानक रस्त्यावरील वाहनतळात घेण्याचा सल्ला एका नागरिकाने दिल्यामुळे त्या परिसरात दुचाकी शोधल्यानंतर तेथील रस्त्यावर दुचाकी बेवारस उभी असल्याची आढळली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांना माहिती मिळाल्यावर रेल्वे स्थानकापर्यंत ही चोरीची दुचाकी येथे कोणी ठेवली याविषयी तांत्रिक तपास सुरू केला आहे. चोरी झालेल्या दुचाकीमध्ये महापालिका कर्मचा-याचे निवडणूक विभागाचे काही कागदपत्र आणि महापालिकेचे ओळखपत्र चोरट्यांनी पळवले.

# अधिकाऱ्याला साडेदहा लाखांचा गंडा

## कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात सायबर चोरट्यांनी कामोठे येथे राहणाऱ्या एका प्रतिष्ठित कंपनीच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्याला तब्बल १० लाख ६८ हजार रुपयांना गंडा घातल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

प्रवीण नरवडे (वय ३७) असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. प्रवीण नरवडे हे मुंबईतील एका प्रतिष्ठित कंपनीच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. नरवडे यांच्या खात्यातून कोणतेही व्यवहार होत नसल्याचे लक्षात आल्याने त्यांनी तातडीने कामोठे येथील आपल्या बँकेत धाव घेतली. बँक अधिकाऱ्यांनी त्यांच्या सिस्टीममध्ये तपासणी केली असता, त्यांच्या खात्यातून ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या काळयात तब्बल २३ व्यवहार झाल्याने त्यांचे खाते ब्लॉक झाल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर नरवडे यांनी बँकेकडून त्यांना मिळालेल्या बँक स्टेटमेंटची तपासणी केली असता, सायबर चोरट्यांनी प्रथम नरवडे यांच्या खात्यातून त्यांच्या परवानगीशिवाय पाच लाख ११ हजार आणि पुन्हा पाच लाख चार हजार ४७९ रुपये असे दोन वेळा 'इंस्टा जम्बो लोन' काढले. त्यानंतर त्याच दिवशी एकूण १० लाख १५ हजार ४७९ रुपयांच्या रकमेचे फिक्स्ड डिपॉझिट (एफडी) मध्ये रूपांतरित केले. त्यानंतर सायबर चोरट्यांनी १ नोव्हेंबर रोजी ही एफडी तत्काळ मोडून टाकली व पुढील दोन दिवसांत हे सर्व पैसे वेगवेगळ्या गिफ्ट'च्या नावाखाली २३ वेळा वेगवेगळ्या अनोळखी बैंक खात्यांमध्ये ट्रान्सफर केले.

यात नरवडे यांच्या मूळ पगाराची ५५ हजार ३४३ रुपयेदेखील त्यांनी परस्पर काढून घेतल्याचे समोर आले. त्यानंतर नरवडे यांनी सायबर पोर्टलवर तक्रार दाखल केल्यानंतर त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावर कामोठे पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्यांविरुद्ध फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.



**पनवेल : सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कोंडले खैरवाडी येथील मरसी होम आश्रमात गरजू मुलांना १०० प्लास्टिक मग वाटण्यात आले. या वेळी सिनु मैथु उपस्थित होते.**

# पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणूक : १४ प्रभागांसाठी आरक्षण फेरसोडत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त निर्देशांनुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी १४ प्रभागांचा समावेश करून फेर सोडत काढण्याचे व त्या अनुषंगाने सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी जागा नेमून देण्याचे बाबत पनवेल महापालिकेकडून सोमवारी (दि.१७) ११ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोडतीद्वारे आरक्षण काढण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या सन २०२५ मधील सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण




सोडत निश्चित करण्याची प्रक्रिया ११ नोव्हेंबर रोजी पार पडली होती.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या पत्रानुसार, एकूण १४ प्रभागामधील (प्रभाग क्र. १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, १०, १३, १४, १६, १९, २०) जागांचा समावेश करून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांच्या सहा जागांची सोडत काढण्याची कार्यवाही शासनाने २० मे, २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या नियमातील तरतुदीनुसार करण्याचे आदेश दिले होते.

तसेच सर्वसाधारण महिलांच्या जागांचे आरक्षण देखील नियमानुसार नेमून देण्याचे आदेश दिले होते. त्यानूसार आज सोडत काढण्यात आली. यामध्ये प्रभाग९- ब, प्रभाग १२ -ब, प्रभाग १५-ब, प्रभाग १७-ब, प्रभाग १८-अ, या जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांकरिता थेट आरक्षित करण्यात आल्या. तसेच आजच्या सोडतीमध्ये प्रभाग १-अ, प्रभाग२-अ, प्रभाग३-ब, प्रभाग१३-ब, प्रभाग१६-अ, प्रभाग१९ -अ या जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता आरक्षित झाले.

सुधारित प्रारूप आरक्षणावरती नागरिकांकडून येणाऱ्या हरकती व सूचना १९ नोव्हेंबर २०२५ पासून स्वीकारल्या जाणार आहेत. या हरकती २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत स्वीकारल्या जाणार आहेत. हरकती व सूचना दाखल करण्यासाठी इच्छुकांनी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात (नागरी सुविधा केंद्र) लेखी अर्ज दाखल करावेत.



**पनवेल : श्री अय्यपा सेवा संघ पनवेल यांच्या वतीने श्री अय्यपा भक्त संगम मोठ्या भक्तीपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला होता. नवीन पनवेल येथे झालेल्या या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन पूज्य गुरुजींचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले तसेच पूज्य स्वामी विश्वेषवारानदा सरस्वती, पूज्य स्वामी श्रीशक्ती शांतानंदा महर्षी आणि पूज्य स्वामी आनंदवनम भारती महाराज यांच्या चरणी नमन करून त्यांचे आशीर्वाद घेतले.**

# युईएस स्कूल आणि कॉलेजमध्ये बाल दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून युईएस इंग्लिश मिडीयम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्समधील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी विविधरंगी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी कविता पठण, कथा सांगणे, एकल गायन, चित्रकला, निबंधलेखनव फॅन्सी ड्रेस ह्या स्पर्धा होत्या तर माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी क्विझ, मास्क



मेंकिंग, बेस्ट आऊट ऑफवेस्ट, फॅन्सी ड्रेस आणि यू. ई. एस. गॉट टॅलेंट स्पर्धा तर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी एक्सटेम्पोर, क्विझ, रांगोळी, टीशर्ट पेंटिंग, डोअर मॅट मेंकिंग व मेहंदीइत्यादी स्पर्धा तर सांस्कृतिक कार्यक्रमात गायन, नृत्य वबॉलीवूडमधील प्रतिष्ठित कलाकारांचा अभिनय करणेइत्यादी विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर केले.

विदयार्थ्यांनी ह्या सर्व स्पर्धांमध्ये मोठया उत्साहाने सहभाग घेऊन स्पर्धा रंगारंग व रंगतदार केली. म्हणूनच युईएस संस्थेच्यासर्व कमिटी मेंबर्स, स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, समन्वयक तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व प्रयत्नांना मनापासून दाद दिली व कौतुकही केले. अश्यारितीने युईएस इंग्लिश मिडीयम स्कूल अण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्समध्ये बालदिन उत्साहात साजरा झाला.

# देवीचापाडा येथे भाजप जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य जनतेची कामे कशी होतील या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क कार्यालय हे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव कार्यरत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी देवीचापाडा येथे भाजपच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनावेळी केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जनतेला विविध सुविधा उपलब्ध होत असून त्यांच्या समस्यांचे निराकरण होत आहेत. त्यानुसार नागरीकांचे प्रश्न तसेच त्यांच्या समस्या सोडवण्सायाठी देवीचापाडा येथे भारतीय जनता पक्षाचे जनसंपर्क कार्यालय सुरू झाले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी झाले.



या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप नेते एकनाथ देशेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, यनित पाटील, कृष्णाशेठ पाटील, अशोक साळुंखे, राम पाटील, महेश पाटील, विनोद पाटील, सुरेश पोरजी, एकनाथ पाटील, शैलेश माळी, अरविंद गोंधळी, शशिकांत गोंधळी, किरण दाभणे, वासुदेव पाटील, ॲड. पवन भोईर, विजय म्हात्रे, महिंद्र म्हात्रे, आकाश फडके, सुदेश फडके, विजय पाटील, रामदास फडके, सागर भोईर, तुकाराम पाटील, अशोक पाटील आदी उपस्थित होते.

# एमएस वर्ड व एक्सेल स्पर्धेत 'सीकेटी'चे प्रदीप तांडेल प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद यांच्यातर्फे शुक्रवारी (दि.१४) शिक्षक व अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी पनवेल तालुकास्तरीय एम एस वर्ड आणि एक्सेल स्पर्धेचे आयोजन रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा नेरे या ठिकाणी केले होते.



या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजचे सहाय्यक शिक्षक प्रदीप तांडेल यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

# रस्त्यांच्या कामांना सुरुवात; भाजपच्या प्रयत्नांना यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीला सुरूवात झाली आहे. भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी महापालिकेकडे केलेल्या मागणीनुसार जुने आदर्श हॉटेल ते बांठिया बंगला रस्त्याचे खड्डे बुजवून पृष्ठीकरण करण्यात आले.

शहरात रस्त्यावर खड्डे पडले असल्याने माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पालिका प्रशासनाकडे विचारणा केली. भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनीही पालिकेला याबाबत लेखी पत्र देवून संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. त्यानुसार रस्त्याचे काम सुरू झाले आहे.

या वेळी सुमित दसवते, साहील मोरे, गौरव सावंत यांच्यासह स्थानिक उपस्थित होते.



## संपादकीय

# बिबट्यांचा प्रश्न सुटेल?

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांचे हल्ले बरेच वाढले आहेत. विशेषत: पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि कोल्हापूर जिल्ह्यात या समस्येने तीव्र स्वरूप धारण केल्याचे सातत्याने दिसते आहे. त्यामुळे बिबट्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी त्यांच्या निर्बिजीकरणाला केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने मान्यता दिली आहे. काही प्रमाणात बिबट्यांचे स्थलांतरही केले जाणार आहे. पण एवढ्यानेच बिबट्यांच्या वाढत्या संख्येचा, हल्ल्यांचा प्रश्न सुटेल का याविषयी ग्रामीण जनता साशंक आहे.

**राज्यात दिवसेंदिवस बिबटे आणि माणसामधील संघर्ष तीव्र होत चालला आहे. पुणे, नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर, सांगली आदी जिल्ह्यांमध्ये आता बिबटे शेतांमधून व गावांमधून वावरताना तसेच अनेकदा पाळीव जनावरांवर व माणसांवरही हल्ले करताना दिसत आहेत. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात स्थानिकांनी गेली २५ वर्षे बिबट्यांच्या हल्ल्यांना तोंड दिले आहे. आता आसपासच्या सर्वच जिल्ह्यांमध्ये बिबट्यांचा वाढता वावर चिंतेचा विषय बनला आहे. गेली अनेक वर्षे या जिल्ह्यांमधील उसाच्या, केळीच्या शेतांमधून बिबट्या वास्तव्य करून आहे. बिबट्या माणसाशी जुळवून घेऊन जगू शकतो असे प्राणीतज्ज्ञ सांगतात. वाढत्या शहरीकरणामुळे आणि जंगलतोडीमुळे पश्चिम महाराष्ट्रातील उसाच्या शेतांमध्ये बिबट्या येऊन पोहोचला. उसाच्या शेतांमध्ये सहज सापडणारी लपण्याची जागा, मुबलक पाणी, जवळच्या वस्त्यांवर कोंबड्या, बकऱ्या, कुत्रे यांची सहज करता येणारी शिकार यामुळे बिबट्याला हा अधिवास भावला व बिबट्यांची पैदास झपाट्याने वाढत गेली. जुन्नर आणि शिरुर तालुक्यांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढल्याने ऊसलागवडीचे प्रमाणही वाढले आणि बिबट्याचा या भागातील वावर वाढतच गेला. या परिसरात जन्मलेल्या बिबट्यांच्या पिल्लांसाठी तर हा परिसर हाच त्यांचा नैसर्गिक अधिवास बनला आहे. आधी कोंबड्या-कुत्री अशा पाळीव प्राण्यांवर व क्वचित लहान मुलांवर हल्ले करणारे बिबटे आता मानवी वस्त्यांमध्ये शिरून प्रसंगी दुचाकीस्वारांवरही हल्ले करू लागले आहेत. शेतात खाली बसून खुरपणी करणाऱ्या शेतमजूर स्त्रिया, घराबाहेर खेळणारी, अभ्यास करणारी मुले ही बिबट्यांच्या हल्ल्यांना बळी पडू लागली आहेत. एखाद्या ठिकाणी घरात शिरून बिबट्याने लहान मुलावर हल्ला केला असेही दिसले आहे. शेतांतून आणि गावांतून हिंडणारा बिबट्या आता शहरी भागाकडेही वळू लागल्याचे समोर आल्याने बिबट्यांच्या समस्येवर परिणामकारक ठोस उपाययोजनेची गरज जाणवू लागली. बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावण्याचा उपाय दीर्घ काळ केला जातो आहे. पण आता हे पिंजरेही कमी पडू लागले आहेत. तसेच बिबटे या पिंजऱ्यांना फसत नसल्याचेही समोर आले आहे. बिबट्यांची वाढती संख्या रोखण्यासाठी नसबंदीची उपाययोजना आधीपासूनच चर्चेत होती. या निर्बिजीकरणाला आता केंद्राची परवानगी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात जुन्नर विभागात सुमारे १२५ बिबट्यांचे प्रायोगिक तत्त्वावर निर्बिजीकरण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. जंगल परिसरात बिबट्यांसाठी खाद्य म्हणून शेळ्या, कोंबड्या सोडण्याचाही विचार आहे. वन्यजीवसाखळी संतुलित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. बिबट्यांचा माग काढण्यासाठी एआय तसेच अत्याधुनिक सॅटेलाइट कॅमेरांचा वापर केला जाणार आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विशेष दक्षता घेतली जाणार आहे. तसेच काही बिबट्यांना गुजरातमधील वनतारा येथे तसेच देशाबाहेरही स्थलांतरित केले जाणार आहे असे सांगितले जाते. या साऱ्या प्रयत्नांतून बिबटप्रवण क्षेत्रातील स्थानिकांना थोडाफार तरी दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे.**

# महाड नगरपालिका निवडणूक चुरशीची होणार



**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ सोमवारी १७ तारखेला उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सदस्य उमेदवारांसाठी एकूण ७४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून थेट जनतेमधून निवडून येणाऱ्या नगराध्यक्ष उमेदवारासाठी ८ उमेदवारी अर्ज दाखल झालेले आहेत. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी यांची महाडच्या इतिहासात प्रथमच युती होत असून या युतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुदेश कलमकर हे आहेत. तसेच एकाकी लढणाऱ्या शिवसेना पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुनील कविस्कर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी उबाठा काँग्रेस व इतर पक्ष मिळून यांनी देखील आपला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून चेतन पोटफोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाने देखील आपले उमेदवार यावेळी उभे केले आहेत. या निवडणुकीत स्वयंभू उमेदवारांनी या अगोदरच प्रचार सुरू केला होता तर अधिकृत उमेदवारांनी आज फॉर्म भरल्यानंतर उद्यापासून त्यांचा अधिकृत प्रचार सुरू होणार आहे.

संपूर्ण कोकणातली महत्त्वाची समजली जाणारी महाड नगरपालिका ही ब्रिटिश कालीन १८५० साली स्थापन झालेली नगरपालिका आहे. ऐतिहासिक अशा चवदारतळ्याच्या सत्याग्रहाची साक्ष असणारी ही नगरपालिका असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या राजधानीचे वैभवणार जपणारी म्हणुन या नगरपालिकेकडे पाहीले जाते. या नगरपालिकेवर एकेकाळी कै सुधाकर अण्णा सावंत यांनी एक हुकमी सत्ता गाजवली होती. त्या काळात ते कुठल्याही पक्षाच्या चिन्हावर नगरपालिका निवडणूक लढवत नसून, महाड शहर विकास आघाडीच्या बॅनरखाली ही निवडणूक लढवली जायची. मात्र असे जरी असले तरी यामागे काँग्रेस पक्षाचा बॅनर हा कायम असायचा. महाड नगरपालिकेचे त्यावेळचे नगराध्यक्ष कै सुधाकर सावंत व युतीच्या सरकारमधील मंत्री कै प्रभाकर मोरे यांच्या एकत्र विचाराने महाड नगरपालिकेचा भरभरून विकास झाला होता. रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणारे कोकणातील ही एकमेव नगरपालिका ठरली होती, मात्र महाड शहरांमध्ये दरवर्षी येणारा पूर व त्याची दिवसेंदिवस वाढत जाणारी पातळी यामुळे महाड शहराचे वैभव काहीसे कमी होऊ लागले होते. कै सुधाकर सावंत यांच्यानंतर त्यांचा वारसा घेऊन कै माजी आमदार माणिकराव जगताप यांनी महाड नगरपालिकेच्या सत्तेची धुरा आपल्या हातामध्ये घेतली. सुरुवातीला काँग्रेस पक्ष, नंतर राष्ट्रवादी पक्ष आणि नंतर पुन्हा काँग्रेस पक्ष असा प्रवास करत त्यांनी महाड नगरपालिकेची सत्ता एक हाती आपल्याकडे राखण्यात यश मिळवले होते. या काळात महाड शहराचा सर्वांगीण विकास व महाड नगरपालिकेचे प्रशासकीय भवन हे विशेष उल्लेखनीय बाब ठरले आहे. युतीच्या काळामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगरपालिका व नगरपरिषदेचे नगराध्यक्ष हे थेट जनतेमधून निवडून देण्याचा निर्णय केल्यामुळे, व नगराध्यक्ष महिला राखीव झाल्या मुळ महाड नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये माणिकराव जगताप यांनी आपली कन्या स्नेहल जगताप हिला रिंगणात उतरविले आणि स्नेहल जगताप यांना नगराध्यक्षपदी निवडून आणले. मात्र कोरोना काळात कै माणिकराव जगताप यांचे दुःखद निधन झाले व त्यानंतर जगताप कुटुंबियांची राजकारणावरची पकड कमजोर पडू लागली. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे निवडणुका होऊ शकला नाहीत व महाड नगरपालिकेला देखील गेल्या तीन वर्षापासून प्रशासकीय कारभार सुरू होता. वाढलेल्या लोकसंख्येमुळे महाड शहराचे चार प्रभाग ऐवजी १० प्रभाग अशी रचना झाली आहे व या १० प्रभागां मधून प्रत्येकी दोन असे २० नगरसेवक सदस्य म्हणून निवडून जाणार आहेत. २०२५ च्या या निवडणुकीत महाड शहरांमध्ये २३ हजार १२४ इतके मतदार मतदान करणार आहेत.

यादरम्यान पुन्हा युतीच्या सरकारमध्ये युतीचे विद्यमान मंत्री भरतशेठ गोगावले यांनी महाड नगरपालिकेवरती पुन्हा आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रयत्नची परिक्रष्टा सुरू केली आहे. महाड शहरांमध्ये येणाऱ्या पुरापासून अटकाव करण्यासाठी सावित्री व गांधारी नदीमधील गाळ काढून पुराचा धोका कमी केल्यामुळे गोगावले यांच्या बद्दल महाड नागरिक व शहरांमधील व्यापाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र यावेळी गोगावले यांचे राजकीय शत्रू समजले जाणारे खासदार सुनील तटकरे यांनी राजकीय खेळी खेळत महाड नगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपाला सोबत घेण्याचा निर्णय घेतला व शिवसेनेला एकाकी पाडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आजच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी पक्ष व भारतीय जनता पार्टी यांची युती झाली असून राष्ट्रवादी १५ तर भाजपा ५ व नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीचे उमेदवार अशी युतीची लढत असणार आहे तर शिवसेनेचे स्वतंत्र वीस सदस्य व नगराध्यक्ष अशी एकाकी लढत शिवसेने देत आहे. याचबरोबर उबाठा देखील महाविकास आघाडी करून आपला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार दिला आहे. नगरपालिका निवडणुकीच्या अगोदर जगताप कुटुंबीयांकडून बरेचसे कार्यकर्ते व माजी नगरसेवक हे भरत गोगावले यांच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत. त्यामुळे एकंदर पाहता शिवसेना पक्षाची या निवडणुकीमध्ये ताकद वाढताना दिसत आहे. एक बाजूला शिवसेनेची मोठी कार्यकर्त्यांची फळी तर दुसऱ्या बाजूला जगताप कुटुंबीयांचा नगरपालिकेच्या विकासाचा वारसा अशीही तुल्यबळ लठत या महाड नगरपालिका निवडणुकीमध्ये पाहायला मिळणार आहे. कित्येक वर्षानंतर म्हणजेच जवळपास दोन दशकानंतर महाड नगरपालिका शिवसेनेकडे येण्याचे प्रयत्न यावेळी गोगावले हे करणार असून, ही त्यांच्या अस्तित्वाची लढाई ठरणार आहे. तर खासदार सुनील तटकरे देखील महाड नगरपालिका निवडणुकी ही आपली प्रतिष्ठेची लढाई करणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. महाड शहरातील जनता महाड शहराचा विकास करणाऱ्या विकासाचा दृष्टिकोन जपणाऱ्या जगताप कुटुंबांकडे जाते की महाड शहराचा विकासाचे स्वप्न बघणाऱ्या भरत गोगावले यांच्या शिवसेनेबरोबर जाते हे पाहणे औचित्याचे ठरणार आहे.

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक बटुकेश्वर दत्त



भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारक बटुकेश्वर दत्त यांचा जन्म बंगाल प्रांतामधील ओरी या गावात १८ नोव्हेंबर १९१० रोजी झाला. कानपूरच्या पीपीएन महाविद्यालयात शिकत असताना थोर क्रांतिकारक भगतसिंग यांच्याशी त्यांची ओळख झाली.

भगतसिंग यांच्या विचारांनी प्रभावित होऊन दत्त हे सुरुवातीला कानपूरमध्ये हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या क्रांतीकारी संघटनेत कार्य करू लागले. या संघटनेत काम करीत असतानाच त्यांनी बॉम्ब बनविण्याचे तंत्र शिकून घेतले व त्यांच्या पुढाकाराने आग्रा येथे एक बॉम्ब बनविण्याचा कारखाना गुप्तपणे चालू करण्यात आला.

लाहोर येथे सायमन आयोगाविरुद्ध निदर्शने करताना झालेल्या जबर लाठीहल्ल्यात ज्येष्ठ क्रांतिकारक लाला लजपतराय हे जखमी होऊन पुढे त्यांचे निधन झाले (१९२८). लालाजींच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी भगतसिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लाठीहल्ल्याचा मुख्य सूत्रधार पोलीस अधिकारी स्कॉट याचा खून करण्याचे ठरविले. तथापि या हल्ल्यात स्कॉटऐवजी दुसरा पोलीस अधिकारी सॉंडर्स मारला गेला.

ब्रिटिश सरकारला अनिर्बंध सत्ता व अधिकार मिळवून देणारी दोन अन्याकारक विधेयके (ट्रेड डिस्प्यूट बिल व पब्लिक सेफ्टी बिल) ब्रिटिश सरकार लादणार होते. या विधेयकांना विरोध करण्यासाठी व लालाजींच्या मृत्यूचा निषेध करण्यासाठी बटुकेश्वर दत्त आणि भगतसिंग यांनी दिल्लीच्या केंद्रीय सभागृहात ८ एप्रिल १९२९ रोजी ही विधेयके मांडण्यात आली तेव्हा प्रेक्षकसज्ञातून कोणालाही हानी होणार नाही अशा पद्धतीने बॉम्ब फेकला, त्यानंतर पळून न जाता दोघेही इन्कलाब जिंदाबाद घोषणा देत सरकारच्या स्वाधीन झाले.

भारतीय स्वातंत्र्यानंतर अंजली या युवतीशी त्यांनी विवाह केला (१९४७) व पाटणा येथे स्थायिक झाले. दिल्ली येथे त्यांचे निधन झाले.

**(साभार : विश्वकोष मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान

## गुगल मॅप्समध्ये आता जेमिनी एआय सपोर्ट

गुगलने भारतातील गुगल मॅप्स वापरकर्त्यांसाठी जेमिनी एआय एकात्मिक (इंटीग्रेट) केले आहे. यामुळे मॅप्स फक्त एक नेव्हिगेशन ॲप नाही, तर तुमचा वैयक्तिक प्रवास सहाय्यक, बोलणे, समजून घेणे आणि भारतीय वापरकर्त्यांवर आधारित निर्णय घेणे शक्य होईल.

यासह, तुम्ही आता बोलून जवळचा पेट्रोल पंप किंवा रेस्टॉरंट शोधू शकता आणि तुम्हाला टाइप न करता पुनरावलोकने, फोटो आणि तपशील देखील मिळतील. अपघात सूचना, वेग मर्यादा आणि दुचाकी नेव्हिगेशन सारख्या नवीन वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे अपडेट लवकरच अँड्रॉइड आणि आयओएसवर रोल आउट होईल, ज्यामुळे प्रवास अधिक स्मार्ट होईल.



भारतात दररोज २५ कोटींहून अधिक लोक गुगल मॅप्स वापरतात. म्हणूनच, ही वैशिष्ट्ये भारतासारख्या देशासाठी उपयुक्त ठरू शकतात, जिथे गर्दीची शहरे, दैनंदिन ऑफिस ट्रॅफिक आणि सुरक्षितता असते.१. आता आवाज मार्ग दाखवेल.आता, गाडी चालवताना तुमच्या मोबाईल फोनला हात लावण्याची गरज नाही. फक्त बोला, आणि जेमिनी एआय तुमच्या सूचनांवर त्वरित प्रक्रिया करेल. उदाहरणार्थ, तुम्हाला तुमचा मार्ग, स्थान किंवा शोध परिणाम त्वरित प्राप्त होतील.


कसे वापरावे: गुगल मॅप्स उघडा. तळाशी असलेल्या मायक्रोफोन आयकॉनवर टॅप करा. तुमची आज्ञा सांगा, आणि उर्वरित काम एआय करेल.

२. प्रवास करण्यापूर्वी स्मार्ट टिप्स

आता, तुम्ही एखाद्या ठिकाणी जाण्यापूर्वीच, तुम्हाला पार्किंगची स्थिती, गर्दी, खाद्यपदार्थांची खासियत आणि जवळपास भेट देण्यासारखी ठिकाणे यासारखी सर्व आवश्यक माहिती मिळेल. एकंदरीत, गुगल मॅप्स आता तुम्हाला फक्त दिशानिर्देश दाखवणार नाही, तर तुमचा स्मार्ट ट्रॅव्हल पार्टनर देखील बनेल.

जेमिनी एआय सह, तुम्ही जवळपास शाकाहारी रेस्टॉरंट कुठे आहे? असे व्हॉइस प्रश्न विचारू शकता आणि एआय पुनरावलोकने, फोटो आणि इतर संबंधित माहितीसह त्वरित अचूक उत्तरे देईल. गाडी चालवताना हँड्स-फ्री वापरासाठी इतर ॲप्सशी लिंक करण्याचा पर्याय देखील आहे.

# चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व्ही. शांताराम



**निमित्त**

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिभावंत निर्माता, दिग्दर्शक, नट व पटकथाकार व्ही. शांताराम संपूर्ण नाव शांताराम राजाराम वणकुद्रे यांचा जन्म कोल्हापूर येथे १८ नोव्हेंबर १९०१ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे किराणा मालाचे दुकान होते व कुटुंबाची आर्थिक स्थिती यथातथाच होती. त्यामुळे शालेय शिक्षण झाल्यावर सुरुवातीला त्यांनी अल्प वेतनावर नोकरी केली. अशा प्रतिकूल काळातच ते दादासाहेब फाळके यांचे चित्रपट, बालगंधर्वांची नाटके, भारतीय व पाश्चात्त्य संगीत अशा कलाक्षेत्रांकडे आकर्षित झाले आणि परिश्रम, कल्पकता व स्वयंप्रेरणा यांच्या बळावर शिकत जाऊन श्रेष्ठ दिग्दर्शक बनले.

१९१४ साली त्यांनी बालगंधर्वांच्या 'गंधर्व नाटक मंडळी'त नट म्हणून प्रवेश केला. १९२० साली फाळके यांच्या पौराणिक मूकपटांच्या यशाने प्रेरित होऊन कोल्हापूरला प्रसिद्ध चित्रकार बाबूराव पेंटर यांनी स्थापलेल्या 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'त ते सामील झाले. बाबूराव पेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रपट कलेची मूळाक्षरे तेथे त्यांनी गिरविली. नेपथ्य, छायाचित्रण, संकलन, अभिनय, खास दृश्ये (स्पेशल इफेक्ट्स) अशा प्रत्येक शाखेतील बारकावे व्ही. शांताराम यांनी तेथे अभ्यासले. याच कंपनीत असताना बाबूराव पेंढारकर यांनी त्यांचे 'व्ही. शांताराम' असे चित्रपटीय नामकरण केले.


महाराष्ट्र फिल्म कंपनीने त्या काळात अनेक मूकपट काढले. त्यांपैकी सुरेखाहरण (१९२१) या पौराणिक मूकपटातील कृष्णाच्या भूमिकेद्वारे त्यांनी रुपेरी पडद्यावर प्रवेश केला. विशेषतः सावकारी पाश (१९२५) या सामाजिक वास्तवाचे अत्यंत प्रभावी चित्रण करणाऱ्या मूकपटाचा शांतारामबापूंवर सखोल परिणाम झाला.

१९२९ साली कोल्हापूर येथे प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. या नव्या कंपनीमुळे भारतीय चित्रपटसृष्टीत एका सुवर्णयुगाला प्रारंभ झाला. या कंपनीने व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनाखाली गोपाळकृष्ण, खुनी खंजर, रानीसाहिबा, उदयकाल, जुलूम, चंद्रसेना इ. पौराणिक व देमार (स्टंट) मूकपट निर्माण केले. १९३२ साली आयोध्येचा राजा हा मराठी (हिंदी अयोध्याका राजा) पहिला बोलपट निर्माण करण्यात आला. त्याचे संगीतदिग्दर्शक गोविंदराव टेंबे होते व प्रमुख भूमिका दुर्गा खोटे, बाबूराव पेंढारकर, मास्टर विनायक इ. नामवंत अभिनेत्यांनी केल्या होत्या. या बोलपटातील इंद्रदरबाराचे नेपथ्य अतिशय नेत्रदीपक होते.

भारतीय चित्रपटसृष्टीत 'बायपॅक' पद्धतीने तयार केलेला पहिला रंगीत बोलपट म्हणजे शांताराम दिग्दर्शित सैरंध्री १९३३मध्ये 'प्रभात'चे स्थलांतर कोल्हापूरहून पुणे येथे झाले. अमृतमंथन या चित्रपटात व्ही. शांताराम यांनी आपले तांत्रिक कौशल्य सिद्ध केले.चमत्कृतीपूर्ण थरारक दृश्ये तसेच नामवंत अभिनेते यांमुळे हा भारतातील पहिला रौप्यमहोत्सव साजरा करणारा चित्रपट ठरला. शांताराम दिग्दर्शित चंद्रसेना हा पौराणिक चित्रपट मराठी, हिंदी, तमिळ अशा तीन भाषांत होता.

**(साभार: विकासपीडिया)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर



## एक ग्लास दूध, दोन खजूर महिलांसाठी फायदेशीर!

आजकालच्या बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांना अनेक शारिरीक समस्यांचा सामना करावा लागतो. मग हार्मोन्सशी संबंधित समस्या, अशक्तपणा, थकवा अशा अनेक समस्या महिलांना सतावत असतात. तर या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी महिला अनेक उपाय करत असतात. पण त्यांना हवा तसा रिझल्ट मिळत नाही. तर तुम्हालाही हार्मोन्सशी संबंधित समस्यांपासून सुटका हवी असेल तर खजुर आणि दूधाचे सेवन करा. महिलांनी एक ग्लास दूधासोबत खजूर खाल्लं तर काय फायदे होतात याबाबत जाणून घेणार आहोत.

मासिक पाळी नियमित होण्यात मदत – बहुतेक महिलांना मासिक पाळी वेळेवर येत नाही. तसंच काही महिलांना पाळीशी संबंधित अनेक समस्या निर्माण होताना दिसतात. तर अशावेळी महिलांनी दूध आणि खजूर खाणं फायदेशीर ठरतं. कारण दूधासोबत खजूर खाल्ल्याने शरीरातील उष्णता वाढते आणि रक्त देखील वाढते. सोबतच रक्तप्रवाह देखील सुरळीत होतो त्यामुळे मासिक पाळी नियमित येण्यास मदत होते. तसेच दुधासोबत खजूर खाल्ल्याने तुम्हाला जास्त भूक लागत नाही आणि तुमचं वजन देखील नियंत्रणात राहते.

हार्मोन्सशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत – दूधासोबत खजूर खाल्ल्यामुळे हार्मोन्सशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत होते. त्यामुळे महिलांनी दूध आणि खजूर खाण खूप फायदेशीर ठरते. खजूर महिलांच्या लैंगिक आरोग्यास प्रोत्साहन देते. तसंच इस्ट्रोजेन पातळी देखील संतुलित करण्यास मदत करते. महत्त्वाचं म्हणजे खजूर आणि दूध झउजऊ च्या समस्येपासून महिलांचा बचाव करते. तर मासिक पाळीदरम्यान स्त्रियांमध्ये राग, चिडचिड होत असते तर खजूर खाल्ल्यामुळे यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

ॲनिमियापासून सुटका – दररोज सकाळी दूधासोबत खजूर खाल्ल्यामुळे ॲनिमियाचा त्रास कमी होण्यास मदत होते. त्यामुळे खजूर आणि दूधाचा समावेश आहारात करणं गरजेचं आहे. खजूर आपल्या शरीराला लोह, व्हिटॅमिन सी, फायबर देते. तसंच गरम दुधात खजुर टाकून ते खाल्लं तर हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत होते.

# अलिबाग, माथेरान, श्रीवर्धन पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

## अलिबागमध्ये भाजप महायुतीच्या तनुजा पेरेकर यांच्यासह इतर उमेदवारांचे अर्ज दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषद निवडणुकीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती झाली आहे. महायुतीतर्फे भाजप नगराध्यक्षपद व नगरसेवक पदाच्या १५ जागा लढवणार आहे. शिवसेना शिंदे गट पाच जागांवर निवडणूक लढणार आहे. सोमवारी (दि. १७ ) भाजप सेना युतीकडून नगराध्यक्षपदासाठी तनुजा पेरेकर यांनी तर नगरसेवक पदासाठी १९ जणांनी आपले अर्ज आज दाखल केले.



सोमवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार तनुजा पेरेकर यांच्यासह इतर युतीचे नगरसेवक पदाचे इतर उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी नगरपालिका प्रशासकीय इमारतीत दाखल झाले. यावेळी भाजप आमदार विक्रांत पाटील, शिवसेना आमदार महेंद्र दळवी, भाजपचे नगरपालिका निवडणूक प्रमुख सतिश धारप, ॲड महेश मोहिते, सुनील दामले, उदय काठे, ॲड. आस्वाद पाटील, महिला आघाडी अध्यक्ष चित्रा पाटील, अशोक वारगे, राष्ट्रवादीचे हर्शल पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

सुरवातीला तनुजा पेरेकर यांनी युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, नंतर नगरसेवक पदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून अश्रफ घट्टे, विकास कर्णेकर, भाजपकडून नईमा घट्टे, भक्ती वारगे, पल्लवी जोशी यांच्यासह इतर १५ अर्ज दाखल केले. भाजपकडून ॲड. अंकित बंगेरा यांनी यापुर्वीच आपला अर्ज दाखल केला होता.

यश पालवणकर, रिध्दी मांजरेकर, सुजाता इंगळे, संतोष साळुंखे, भक्ती वारगे, रंजीत शिंदे, विजया पार्सेकर, कृष्णनाथ चाळके, अमिता सोनवणे, राजेश प्रधान, देवेन सोनवणे, पल्लवी जोशी, विकास कर्णेकर, नईमा घट्टे, अंकीत बंगेरा, रईसा अख्तर, अश्रफ घट्टे, वैजयंती पाटील, मनीष पेरेकर, प्रवीण भगत, दत्तात्रेय तांडेल, विजेता सारंग अशी युतीच्या उमेदवारांची नावे आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी नामनिर्देशन पत्र भरण्याची मुदत संपायला अवघा अर्धा तास शिल्लक असतांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ॲड. कविता प्रविण ठाकूर यांनी नगराध्यक्षपदासाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

## माथेरानमध्ये महायुतीकडून नगराध्यक्षपदासाठी चंद्रकांत चौधरी

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्ष,शिवसेना शिंदे गट आणि आर.पी. आय महायुती कडून नगराध्यक्ष पदासाठी चंद्रकांत चौधरी यांचे नाव जाहीर झाले होते.सोम.दि.१७ रोजी माथेरान शहरात वाजत गाजत रॅली काढून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी तसेच महायुतीतील एकूण दहा प्रभागात उभे असलेल्या सर्व उमेदवारांनीआपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

माथेरान शहर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकी साठी महायुतीकडून जोरदार शक्तिप्रदर्शनकरीत उमेदवारांनी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.सोम.दि.१७ ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उबाठा यांनी पण शिवराष्ट्र पॅनल च्या माध्यमातून सर्व उमेदवारी अर्ज दाखल केले. सर्वप्रथम महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र सिंह ठाकूर यांच्या कडे सादर केला.यावेळी त्यांच्या सोबत शहर प्रमुख मनोज खेडकर,प्रसाद थोरवे आणि भाजपचे मंगेश म्हसकर उपस्थित होते.



## बेशिस्त वाहनचालकांना दंड

**अलिबाग :** जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

२८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.१६) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३१८ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून तीन लाख दोन हजार रुपये इतका दंड आकारला आहे.


**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
Tal. Panvel, Dist. Raigad. Pin 410206

**CORRIGENDUM FOR TENDER NOTICE**
Tender No:- PMC/CE/PMAY/212/2025-26- Second Call
**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "Mixed** Use Development under PMAY with Rehabilitation of Slum Dwellers of Plot No. 307A at. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206"

Offers by way of e-tendering (Lump Sum PPP form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works.

| Name of work | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document (Rs.) |
|---|---|---|---|
| Mixed Use Development under PMAY with Rehabilitation of Slum Dwellers of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206. | Rs. 30,00,000/- | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/- + 18% GST Total Rs.5900/- (Non refundable) |
| **Last date of submission of tender has been extended up to 01/12/2025** | | | |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender are available on website **www.mahatenders.gov.in.** Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document **from 06/11/2025 from 5.00 P.M. to 30/11/2025 up to 5.00 PM.** Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be **01/12/2025 up to 5.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

Date : 17/11/2025

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.६०४/६२५/२०२५

**Sd/-**
Additional Commissioner-I
Panvel Municipal Corporation,
Panvel 410 206


## श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादी-भाजप आघाडीतर्फे नगराध्यक्षपदासाठी जितेंद्र सातनाक मैदानात

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने जोरदार शक्तिप्रदर्शन करत थेट नगराध्यक्षपदासाठीचे उमेदवार जितेंद्र सातनाक यांचा उमेदवारी अर्ज मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत दाखल केला. जितेंद्र सातनाक हे श्रीवर्धन शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष असून या अगोदरदेखील त्यांनी नगराध्यक्षपद भूषविले होते.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अन्य नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी देखील आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यामध्ये माजी नगरसेवक अनंत गुरव, अनुष्का कदम, प्रविता माने, हरिदास वाघे, प्रसाद विचारे,अमेय कोसबे, राजसी मुरकर, समीर साठविलकर या उमेदवारांनी देखील आपले अर्ज दाखल केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील अनेक उमेदवार इच्छुक होते. परंतु सर्वांना उमेदवारी मिळणे शक्य नसल्याने पक्षाने ज्यांच्यावरती विश्वास दाखवला आहे. अशा सर्व उमेदवारांना एकजुटीने निवडून देण्याचे आवाहन पक्षश्रेष्ठीकडून करण्यात आले आहे. श्रीवर्धन नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटा करून देखील उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्यामुळे यावेळी निवडणुकीमध्ये जोरदार रस्सीखेच होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने भारतीय जनता पार्टी, त्याचप्रमाणे शिवसेना (उबाठा) व शिवसेना शिंदे गटातील उमेदवारांनीदेखील आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

शिवसेना (उबाठा) कडून थेट नगराध्यक्ष पदासाठी ॲडवोकेट अतुल चौगुले यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र शिवसेना शिंदे गटाकडून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार देण्यात आलेला नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस भाजप आघाडी विरुद्ध शिवसेना (उबाठा),पत्रकार रामचंद्र घोडमोडे असा तिरंगी सामना रंगणार आहे. राष्ट्रीय काँग्रेस कडून सुद्धा काही उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. अर्ज मागे घेण्याच्या दिवशी श्रीवर्धन सार्वत्रिक नगरपरिषद निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.


**''नोटीस''**

विषय:- उशिरा जन्म नोंद करणेबाबत.

संदर्भ :- अर्जदार श्री. हनुमान राम पाटील, यांचा दि. ०६/१०/२०२५ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. हनुमान राम पाटील, रा. सांगडे, पो. अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड यांनी त्यांचा मुलगा **अदित्य हनुमान पाटील** यांचा उशिरा जन्माचा नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १२/१२/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/११/२०२५

**सही/-**
**(जितेंद्र मा. इंगळे-पाटील)**
अपर तहसीलदार पनवेल



जा.क्र.२५४४/२५
सहाय्यक धर्मदाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि. रायगड
दिनांक : १७/११/२०२५

**चौकशीची जाहीर नोटीस**
**नियम ७ अ प्रमाणे**

अर्ज क्र. ४२८/२०२५
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक
: श्री. गणेश सेवा चॅरिटेबल ट्रस्ट ... बाबत
श्री. रविंद्र प्रसाद अगस्ती, रा. कळंबोली ...अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड, हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनीयम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

**(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे का ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?**
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?**
**(अ) जंगम मिळकत : (वर्णन) रोख रक्कम ५०००/- रुपये**
**(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्यानिशी आज दिनांक १७.११.२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधीक्षक**
शिक्का
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना क्र. २**
**ई निविदा सूचना क्र. ५८/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ०४/११/२०२५ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई , दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत, कंत्राटदारांचे प्रश्न संकेतस्थळावर नोंदविणे व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र.... तळोजा सांडपाणी निःसारण योजना टप्पा क्र.१ येथील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील नव्याने बांधलेल्या १५०० घनमीटर स्टोरेज कम कलेक्शन संप करीता पंपिंग मशिनरी व संबंधित उपकरणांचा पुरवठा करून, उभारणी करणे, चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ ४,४२,४६,४०७.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २४/११/२०२५ **पर्यंत** शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १९/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २०/११/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**ग्रुप ग्रामपंचायत कलोते**
मु. कलोते, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड
ई-मेल : grampanchyatkalote@gmail.com

**निविदा जाहिरात**

ग्रुप ग्रामपंचायत कलोते ता. खालापूर जि. रायगड ग्रामपंचायतीची सन २०२४-२०२५ या वर्षातील १५ वित्त आयोग व ग्रामनिधी अंतर्गत खालील कामाची निविदा प्रसिद्ध करीत आहोत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधीचा स्त्रोत | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलोते रयती पोंडावाडी विहीर. दुरुस्ती करण. | १५ वित्त आयोग | ४९,७८४/- | ४९७.८४ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| २ | विणेगाव रामवाडी बापदेववाडी विहीर दुरुस्ती करणे. | १५ वित्त आयोग | ७४,९८०/- | ७४९.८० | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ३ | कलोते मोकाशी वाडी विहीर दुरुस्ती करणे. | १५ वित्त आयोग | १,०२,८८७/- | १०२८.८७ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ४ | कलोते मोकाशी पाईपलाईन दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी | ८९८०/- | ८९.८० | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ५ | विणेगाव बापदेववाडी पाईपलाईन दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी | १५९३९/- | १५९.३९ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ६ | ग्रा.पं. हद्दीतील ४ शीट शौचालयाला पाईपलाईन कनेक्शन देणे. | ग्रामनिधी | ८०,८५९/- | ८०८.५९ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ७ | कलोते मोकाशीवाडी येथे श्री. देहू शिंगवा ते श्री. जाणू शिंगवा यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता करणे. | ग्रामनिधी | ७०,०००/- | ७०० | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ८ | कांढरोली तर्फे वनखळ शाळा व अंगणवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | २,१०,३७४/- | २१०३.७४ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ९ | विणेगाव शाळा व अंगणवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | २,१०,३७४/- | २१०३.७४ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १० | कलोते ठाकूरवाडी शाळा व अंगणवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | २,१०,३७४/- | २१०३.७४ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| ११ | कलोते रयती पोंडावाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | १,१९,५३६/- | ११९५.३६ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १२. | विणेगाव रामवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | १,०६,११३/- | १०६१.१३ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १३. | विणेगाव दांडवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | १,२४,०९७/- | १२४०.९७ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १४ | कांढरोली तर्फे वनखळ येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | १,२४,०९७/- | १२४०.९७ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १५ | कलोते रयती शाळा व अंगणवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | २,३०,४३३/- | २३०४.३३ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १६ | कलोते मोकाशी शाळा व अंगणवाडी येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | १,५८,३४४/- | १५८३.४४ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १७. | विणेगाव कातळाचीवाडी शाळा येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | २,६६,५१५/- | २६६५.१५ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |
| १८ | विणेगाव येथे CCTV कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | १,१९,५३६/- | ११९५.३६ | ३ महिने | २४/११/२५ स.१० वा. ते दु.२.३० वा. पर्यंत. |

**अटी व शर्ती :**
१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडा कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व त्याची फी भरून प्रत उपलब्ध करून देण्यात येईल.
२) नियमानुसार सुरक्षा अनामत व विविध कर बिलातून कपात केले जातील.
३) कामाचे दोष व निवारण कालावधी काम पूर्ण झाल्यापासून ६ महिने पर्यंत राहिल.
४) रीतसर उपरोक्त व अन्य अटीशर्तीबाबत करारनामा करून कार्यारंभ आदेश दिले जातील.
५) सदर विकासकामांच्या निविदा २४/११/२०२५ रोजी दुपारी ३.३० वा ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

**टीप :-** इतर अटी व शर्ती व अधिक माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.

ठिकाण :- कलोते
दिनांक :- १७/११/२०२५

**सही/-**
**श्री. निलेश बाळाराम म्हसकर**
ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत
कलोते ता. खालापूर, जि. रायगड

# पनवेलच्या चारही प्रभागांमध्ये रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेने चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामे युद्धपातळीवर सुरू केली आहेत.आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार गेल्या काही दिवसांपासून अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व शहर अभियंता संजय कटेकर स्वतः प्रत्यक्षात चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामाची पाहाणी करत आहेत. कामाचा आढावा घेऊन सूचना देत आहेत.

नवीन पनवेलमधील रस्त्याची प्रत्यक्षात जाऊन शहर अभियंता संजय कटेकर यांनी सोमवारी (दि.१७) पाहणी केली. या वेळी कनिष्ठ अभियंत्यांकडून नवीन पनवेलमधील विविध ठिकाणी सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाचा आढावा घेतला. नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन लवकरात लवकर कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता आपल्या आपल्या प्रभागात रात्रंदिवस रस्ते दुरुस्तीची कामे करत आहेत. महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील रस्त्यांची कामे वेगाने सुरू आहेत. यामध्ये खारघरमध्ये सेक्टर ११ रायन स्कूल रोड, कोपरा ब्रीज रोड, सेक्टर ३५मधील रस्ते, कामोठे सेक्टर ३४ मधील मुख्य रस्ता, फुटबॉल स्टेडियम रोड, सेक्टर १२ मधील कृष्णा हॉटेल शेजारचे रस्ते, कळंबोलीमध्ये १ई, २ई मधील रस्ते, नवीन पनवेल सेक्टर ३, डिमार्ट रस्ता, अशा विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने सुरू आहेत.

# नवी मुंबई मेट्रोमध्ये एक कोटींहून अधिक प्रवासी वाहतूक

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर वरील मेट्रो सेवेने सुरू झाल्यापासून ते आजतागायत या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये प्रवासी संख्येचा एकूण १,१५,२८,२९७ इतका टप्पा गाठला आहे. सिडको मेट्रोच्या या देदीप्यमान यशाकरिता सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी मेट्रोच्या टीमचे अभिनंदन केले आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्याकरिता नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर विकसित करण्यात आला असून १७ नोव्हेंबर २०२३ पासून या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाली आहे. मेट्रोची सेवा पंतप्रधान



यांच्या हस्ते १२ जानेवारी २०२४ रोजी देशाला समर्पित करण्यात आली. या मेट्रो सेवेमुळे सीबीडी बेलापूर, खारघर आणि तळोजा परिसराला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.

सध्या गर्दीच्या वेळी दर १० मिनिटांनी बेलापूर व तळोजा स्थानकांदरम्यान दोन्ही दिशांना मेट्रोच्या फेऱ्या उपलब्ध आहेत. तर उर्वरित वेळांमध्ये दर पंधरा मिनिटांनी मेट्रोची फेरी उपलब्ध आहे. मेट्रोच्या तिकीट दरात कपात करण्यात येऊन सध्या तिकीटाचा किमान दर रु. १० व कमाल रू ३० इतका आहे. या प्रवासीस्नेही सुधारणांमुळे सदर मार्गावरील मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. यामुळे अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये मेट्रोच्या प्रवासी संख्येचा एक कोटीहून अधिक टप्पा गाठणे शक्य झाले आहे.

मेट्रो मार्ग क्र. १ चा विस्तार बेलापूरपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत करण्यात येणार आहे. तसेच १६ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग क्र. २ पेंधर ते तळोजा एमआयडीसी दरम्यान नियोजित असून कळंबोली आणि कामोठे मार्गे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत या मार्गाचा विस्तार करण्यात येणार आहे.

> **मेट्रो सेवेच्या प्रवासी संख्येने गाठलेला एक कोटींहून अधिक आकडा हा मेट्रो सेवेला लाभत असलेला प्रवाशांच्या उदंड प्रतिसादाचे प्रतीक आहे. या मेट्रो मार्गामुळे बेलापूर, खारघर व तळोजा परिसरातील कार्यालये, गृहसंकुले व उद्योग-व्यवसाय यांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी लाभली आहे. नवी मुंबईकरांनी सिडकोच्या मेट्रो सेवेप्रति दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.**
>
> **-विजय सिंघल, उपाध्यक्ष, सिडको**

# शाळकरी मुलीला पळवून नेणाऱ्या आरोपीला ओडिशातून अटक

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरातून १६ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला फूस लावून पळवून नेणाऱ्या आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिला गरोदर करणाऱ्या आरोपीच्या कामोठे पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी आरोपीला ओडीशा येथून मोठ्या शिताफीने अटक करून त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका केली आहे. तसेच तिला तिच्या कुटुंबियांच्या ताब्यात दिले आहे.

मुन्ना रविशंकर प्रधान (वय २१) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. कामोठे परिसरात आई-वडिलांसोबत राहणारी पीडित मुलगी शिक्षण घेत आहे. याच भागात कामानिमित्त राहणाऱ्या मूळच्या ओडीसा राज्यातील मुत्रा प्रधान याच्यासोबत तिचे प्रेमसंबंध जुळले होते. या प्रेमसंबंधाचा फायदा घेत आरोपी मुन्ना प्रधान याने संधी साधून या अल्पवयीन मुलीला फूस लावून तिला पळवून नेले होते. घरातील मुलगी अचानक बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच, पीडित मुलीच्या कुटुंबियांनी तातडीने कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तत्काळ अपहरणाचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला होता. पोलिसांनी तांत्रिक कौशल्याने लावला छडा पीडित मुलीच्या कुटुंबियांनी आरोपी मुत्रा प्रधानवर संशय व्यक्त केला होता, कारण ती त्याच्यासोबत संपर्कात होती. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारावर आरोपी मुना प्रधानचा शोध घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला आरोपीचा मोबाईल बंद असल्याने पोलिसांना त्याच्या ठावठिकाणा मिळत नव्हता, मात्र पोलिसांनी तपास सुरू ठेवला असतानाच, अचानक त्याचा फोन सुरू झाला आणि त्याचे ओडीशा येथील लोकेशन पोलिसांना मिळाले.

ओडीशातून आवळल्या मुसक्या मिळालेल्या माहितीनुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश पगारे व त्यांच्या विशेष पथकाने तात्काळ ओडीसाकडे धाव घेतली. तिथे त्यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने तपास करत आरोपी मुन्ना रविशंकर प्रधान याला अटक करून पनवेल येथे आणले.



## रसायनी, वासांबे परिसरातील जि.प.शाळांना डिजिटल साहित्य

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वांसाबे जिल्हा परिषदेतील सर्व जिल्हा परिषद शाळा तसेच जनता विद्यालय मोहोपाडा येथे ५४ संगणक, प्रिंटर, स्कॅनर प्रिंटर, तसेच डिजिटल स्क्रीन खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

हल्लीच्या डिजिटलायझेशनच्या युगात मराठी शाळा मागे राहु नयेत, तसेच परीसरातील होतकर, गरजू विद्यार्थी संगणक साक्षर व्हावे यादृष्टीने हे अत्याधुनिक साहीत्य खूप मोलाचे कार्य करेल. शाळांना देण्यात आलेल्या डॅशबोर्ड स्कीनमध्ये सर्व इयत्ताचा विषयनिहाय अभ्यासक्रम आधीच अपलोड करून दिलेला आहे. या साहीत्याचा शाळेतील गुणवत्ता वाढण्यासाठी निश्चितच होईल.

संदीप मुंढे व उमा मुंढे यांच्या सततच्या पाठपुराव्याने हे साहीत्य वासांबे परीसरातील शाळांना मिळाले म्हणून सर्व संस्था व शिक्षकवर्ग यांनी सदर अत्यावश्यक साहीत्य शाळेला मिळवुन दिल्याबद्दल सरपंच उमा मुंढे व माजी सरपंच संदीप मुंढे यांचे आभार मानले आहेत.

# वाशी विभागात अनधिकृत बांधकामावर मनपाची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने वाशी विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

वाशी विभाग कार्यक्षेत्रातील वाशीगाव, जागृतेश्वर मंदीराच्या मागे उच्च दाबाच्या वाहीनीखाली येथे बेकायदेशीर अनधिकृत झोपडपटटया वसलेल्या आहेत. या अनधिकृत झोपडपटटयांवर शुक्रवारी (दि.१४) सी विभाग वाशी कार्यालयामार्फत तोडक



कारवाई करुन अंदाजे ८० ते ९० अनाधिकृत झोपड्या, सात भंगार गोडाऊन व गॅरेजनिष्कासित करण्यात आले.

या धडक मोहिमेसाठी वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुखदेव येडवे, वाशी विभाग कार्यालयातील अधिकारी अथवा कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच स्थानिक पोलीस, अतिक्रमण पोलीस, १५ मजूर व दोन जेसीबीच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुस्तकांचे वाटप

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बाल दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पुस्तक वाटपचा उपक्रम मोठ्या उत्साहात झाला.

शाळेचे संस्थापक ॲड. सुनील भोवते, डायरेक्टर योगेश सानप, तसेच मुख्याध्यापक व शाळेतील सर्व कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि वाचन संस्कृती रुजवण्यासाठी शाळा सातत्याने अशा उपक्रमांवर भर देते, हे या कार्यक्रमातून पुन्हा अधोरेखित झाले.

लहान विद्यार्थ्यांना फुले, फळे, भाजीपाला, प्राणी, पक्षी, चांगल्या सवयी, अक्षर ओळख, कार्टून कथा अशा



विविध विषयांवरील रंगीत आणि आकर्षक चित्रपुस्तकांचे वितरण करण्यात आले. अशा पुस्तकांमुळे मुलांना खेळता-खेळता शिकण्याची संधी मिळते, तसेच ज्ञानाची आवड आणि कल्पनाशक्तीही विकसित होते. पुस्तके स्वीकारताना मुलांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या आनंदात बालदिनाचा खरा आनंद अनुभवायला मिळत होता.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षणाचे महत्त्व, विशेषतः वाचनाच्या सवयीचे मुलांच्या भविष्यातील घडणीत असणारे स्थान अधोरेखित केले.

त्यांनी सांगितले की, मुलं ही देशाची भविष्य आहेत आणि त्यांना जर वाचनाची गोडी लावली तर एक सुदृढ भारत निर्माण होण्यास नक्कीच मदत होईल.

बाल दिनाच्या निमित्ताने आपल्या भाषणात समाधान साबळे सर म्हणाले, स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस आपण 'बालदिन' म्हणून साजरा करतो. नेहरूंचा मुलांवर असलेला प्रेमभाव आणि त्यांचे संस्कार आपण आजच्या पिढीपर्यंत पोहचवणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.

उपक्रमासाठी अनिल सुपडा पाटील, शारदा प्रकाशनचे संतोष राणे, दीपक नप्ते, अंबादास जाधव, अंजना दिपेश सरोज, समाधान साबळे सर आदींनी मोलाचे योगदान दिले.

या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे पुस्तक वाटप उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. शाळेच्या सभागृहात मुलांचे टाळ्यांचा कडकडाट, शिक्षकांची प्रोत्साहनपर उपस्थिती आणि मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे हा बालदिन विद्यार्थ्यांसाठी खास आणि संस्मरणीय ठरला.

# इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे युवा नीती उपक्रमांतर्गत प्रेरणादायी पॅनेल चर्चा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाऊंडेशनच्या युवा नीती या युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१४) दोन महाविद्यालयांमध्ये पॅनेल चर्चांचे आयोजन करण्यात आले.

पहिली पॅनेल चर्चा बकलीवाल फाऊंडेशन कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाशी येथे आयोजित करण्यात आली. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. शरदकुमार शाह यांनी भूषविले, तर कार्यक्रमाचे समन्वयन राणी डिसूझा यांनी केले. या सत्रासाठी बाकलीवाल फाउंडेशनच्या कार्यकारी अध्यक्ष सीमा बकलीवाल या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिल्या.

दुसरी पॅनेल चर्चा दुपारी साडेतीन वाजता टिळक कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ येथे पार पडली. या सत्राच्या अध्यक्षा डॉ. हिना समानी होत्या, तर कार्यक्रमाचे समन्वयन सौ. नीतू राय यांनी केले. दोन्ही सत्रांत विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग आणि महाविद्यालयीन



प्रशासनाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पॅनेलिस्टमध्ये मयूरेश नेतकर (सिनेट सदस्य, मुंबई विद्यापीठ), श्रद्धा सिंग (अध्यक्षा, सर्व विथ श्रद्धा संस्था), विनायक सालुंखे (प्रादेशिक कार्यवाहक, अर्थ डे नेटवर्क), विवेक सोनवणे (धोरणविशेषज्ञ व रणनीतीकार) यांचा समावेश आहे.

सर्व मान्यवरांनी युवकांची सार्वजनिक धोरणांवरील समज, पर्यावरण संरक्षणातील भूमिका, सामाजिक नेतृत्व, जबाबदार नागरिकत्व आणि शैक्षणिक प्रगती या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला.

इन्फिनिटी फाऊंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला यांनी सांगितले की, आजचे विद्यार्थी म्हणजे उद्याचे धोरणनायक; त्यांना योग्य व्यासपीठ व दिशा प्रदान करणे हीच आमची जबाबदारी आहे.

या दोन्ही संस्थांतील प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, आयोजक आणि इन्फिनिटी फाऊंडेशनच्या टीमच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे हा उपक्रम विशेष यशस्वी ठरला. युवकांमध्ये जागरूकता, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

# नवी मुंबईतील शाळांमध्ये बाल दिनानिमित्त विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका



क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये बालदिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

बाल दिनानिमित्त शाळा स्तरावर विविध स्पर्धांचे व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना शाळेकडून गोड खाऊ वाटण्यात आला. चॉकलेट देण्यात आली. गुलाबाची फुले वाटप करण्यात आली. त्याचप्रमाणे भारताचे माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

या वेळी शाळा स्तरावर विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. काही शाळांमध्ये चित्रकला स्पर्धा घेतल्या गेल्या. नमुंमपा शाळा क्रमांक ९३, सीबीएससी स्कूल यांनी विद्यार्थ्यांना कार्टून चित्रपट दाखविला. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे नृत्य, गायन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थी अत्यंत उत्साहाने आनंददायी खेळात सहभागी होऊन बालदिनाचा आनंद लुटला. या वेळी शिक्षकही विद्यार्थ्यांमध्ये लहान होऊन सहभागी होत बालदिनाचा आनंद घेताना दिसून आले.

काही शाळांमध्ये विविध विषयांवर पथनाट्यसुद्धा सादर झाली. बाल दिनाचे औचित्य साधून शिक्षकांनी अध्यापनासह विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांसमवेत अत्यंत आनंदाने बाल दिन साजरा केला.

# 'महिलांना सक्षम बनवण्यासाठी उद्योग-व्यवसायात मदत करणार'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरस्वती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, कळंबोलीची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि सरस्वती महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित कळंबोलीची तिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा १५ नोव्हेंबर रोजी कळंबोली येथे पार पडली. या वेळी महिलांना व्यवसायाची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला अनेक महिला उपस्थित होत्या.

सरस्वती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था ही महिलांसाठी काम करते. त्यांना स्वतः च्या पायावर उभे करण्यासाठी अनेक वर्ष उपक्रम राबवत आहे. अशाच प्रकारे कळंबोली येथे १५ नोव्हेंबर रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महिलांनी साडीचा व्यवसाय करावा त्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल असे आवाहन अध्यक्ष कुंदा गोळे यांनी केले. कुटुंबाची जबाबदारी ज्याप्रमाणे पुरुषावरती आहे तशीच आता ती



महिलावर येऊन पडलेली आहे त्यामुळे महिलांनी सुद्धा पुढे येऊन उद्योग व्यवसाय केले पाहिजेत यासाठी आता घरातील कामात अडकून न पडता पुढे येणे गरजेचे आहे अशा महिलांना उद्योग, व्यवसायामध्ये मदत करण्यासाठी व सक्षम बनवण्यासाठी सरस्वती महिला संस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या काळात ना नफा ना तोटा या संकल्पनेतून व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत याचा फायदा महिला भगिनींनी घ्यावा असे आवाहन कुंदा गोळे यांनी केले.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, शिवसेनेचे प्रशांत कदम, राष्ट्रवादी महिला जिल्हा सचिव चंचला बनकर, ॲड. वैशाली पंडित, संस्थेच्या सचिव सुषमा कामतेकर, ज्योत्स्ना गोळे, वैशाली महाजन, रूपाली शिवथरे, सुनीता गुरव, सीमा पाटील, सरिता गुरव, अनिता कुलकर्णी, वैशाली सुर्वे, पुष्पा शिवजातक, शकुंतला गोगावले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# डॉ.संदीप धुरत यांना डि.लीट पदवी

**नवी मुंबई : बातमीदार**



नवोन्मेष, हायड्रोजन तंत्रज्ञान आणि न्यूरोडायव्हर्सिटी समावेशन या क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबईतील संशोधक, शोधकर्ता आणि लेखक डॉ.संदीप पी. धुरत यांना डनस्टर स्वित्झर्लंड येथील बिझनेस स्कूलने मानद डॉक्टरेट ही आंतरराष्ट्रीय दर्जाची पदवी प्रदान केली आहे.

डॉ.धुरत यांनी कोणत्याही शैक्षणिक नामांकनाशिवाय, केवळ त्यांच्या संशोधन, पेटंट आणि समाजोपयोगी परिणामकारक कार्याच्या बळावर हा सन्मान मिळवला आहे. हा सन्मान मिळवणारे ते भारतातील पहिले व्यक्ती ठरले आहेत. धुरत हे दादर मुंबईतील असले तरी गेले १५ वर्ष ते नवी मुंबईत आपला व्यवसाय करत आहेत.

डॉ. धुरत यांनी २४ पेटंट्स दाखल केले असून, त्यांच्या संशोधनात हायड्रोजन तंत्रज्ञान, स्वच्छ ऊर्जा प्रणाली, आणि सस्टेनेबल इनोव्हेशन यांचा समावेश आहे. त्यांनी वाहनांसाठी सुरक्षित, कॉम्पॅक्ट आणि कार्यक्षम हायड्रोजन स्टोरेज प्रणाली, हायड्रोजन सुरक्षा आणि कार्यक्षमतेसाठी नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाची मानक प्रणाली, न्यूरोडायव्हर्जंट व्यावसायिकांसाठी समावेशक रोजगार मानके आणि कोडिंग सिस्टीम या महत्त्वाच्या नवकल्पना विकसित केल्या आहेत.

डॉ.धुरत यांनी आपली प्रतिक्रीया व्यक्त करताना, भारताला स्वच्छ ऊर्जा, समावेशन आणि नवोन्मेष अर्थव्यवस्थेचा जागतिक नेता बनवण्याचे त्यांचे ध्येय असल्याचे स्पष्ट केले आहे.

# श्रीवर्धनमध्ये गुटखामाफिया पुन्हा सक्रिय

## बेकायदेशीर वितरण सुरू; कायद्याला उघड आव्हान!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात गुटखा बंदीची अंमलबजावणी पुन्हा एकदा प्रश्नचिन्हात येत आहे. ऑगस्ट महिन्यात ९८,००० रुपयांचा गुटखा जप्त करून श्रीवर्धन पोलिसांनी गुटखा माफियांना मोठा धक्का दिला होता. त्या कारवाईनंतर तब्बल तीन महिने माफियांनी पुरवठा थांबवला, मात्र गेल्या आठवडाभरात गुटख्याचे वितरण पुन्हा सुरू झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

महाराष्ट्र शासनाने तंबाखू, निकोटीन आणि मॅग्नेशियम कार्बोनेट असलेल्या गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखू उत्पादनांवर पूर्ण बंदी घातली आहे. तरीही श्रीवर्धन शहर आणि तालुक्यातील निवडक टोबॅको दुकाने




व टपऱ्यांवर सदर पदार्थांची छुप्या पद्धतीने विक्री सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत.

एप्रिल २०२४मध्ये एफडीए आणि पोलिसांच्या संयुक्त कारवाईत काही टपऱ्यांवर धाड टाकून सामग्री जप्त करण्यात आली होती. गुटखा विक्री करणाऱ्या काही दुकानांवर बनावट ग्राहक पाठवून पुरावे गोळा करण्याचा प्रयत्नही झाला, परंतु खबऱ्यांनी आधीच माहिती गळवल्याने काही ठिकाणी कारवाई निष्फळ ठरली.

तीन महिन्यांपूर्वी पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एका वितरकाच्या कारची झडती घेतली असता गुटख्याच्या पिशव्या जप्त झाल्या होत्या. या कारवाईनंतर गुटखा जाळे काही काळ थंडावले होते, पण आता पुन्हा एकदा रात्रीच्या सुमारास वितरण वाढल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

> **गुटखा विक्रेत्यांवर सतत लक्ष ठेवून कारवाया केल्या जात आहेत. पर्यटकांकडून सोबत आणलेला माल स्थानिकांकडे फिरत असल्याचीही शक्यता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. नागरिकांनी गुटख्याशी संबंधित कोणतीही संशयास्पद माहिती मिळाल्यास ती तत्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. श्रीवर्धन पर्यटनस्थळ असल्याने कायद्याचे पालन अत्यावश्यक आहे.**
> **–उमेश पाटील,** पोलीस निरीक्षक, श्रीवर्धन पोलीस ठाणे

# लोकल रेल्वेगाड्यांमधील समस्या सोडविण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

रेल्वे प्रशासन लोकल गाड्यापेक्षा एक्सप्रेस गाड्यांना प्राधान्य देत असल्या कारणाने कर्जतकर प्रवाशांना होणाऱ्या त्रासाच्या बाबतीत कर्जतकरांच्या रेल्वे समस्या विषयी रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली आहे.

कर्जत रेल्वे स्थानकात नेहमीच एक्सप्रेस गाड्यांना प्राधान्य देत असल्या कारणाने लोकल गाड्यांना कर्जतच्या आउटरला थांबविण्यात येत असल्याने कर्जतकर प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. या बाबत सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. १० नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हून संध्याकाळी ७. ५२ वाजता कर्जतला येणारी लोकल कर्जतच्या आऊटरला जवळ जवळ पंधरा मिनिटे थांबवून एक्सप्रेस गाड्यांना प्राधान्य दिले गेले होते.

ओसवाल यांनी वरील बाबतीत रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली आहे व या एक्सप्रेस गाड्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव आपणास द्यावे. म्हणजे आपण या बाबत खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे या बाबतीत तक्रार करू जेणे करून ते या बाबतीत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून कर्जतकरांना होणाऱ्या त्रासापासून मुक्तता करतील.

१० नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून संध्याकाळी ७.५२ वाजता कर्जतला येणारी लोकल, कर्जत च्या आऊटरला जवळ जवळ पंधरा मिनिटे थांबवली गेली होती व त्याच वेळेत पुण्याहून एक एक्सप्रेस गाडी काढण्यात आली होती. वरील दोन्ही एक्सप्रेस गाड्या जाण्यासाठी साठी वरील लोकल आउटरलाच थांबविण्यात आली होती. तसेच सदर लोकल कर्जत रेल्वे स्थानकावर पोहचल्या नंतर, कर्जत रेल्वे स्थानकातील सर्वच फलाट रिकामी होते. मग त्यावेळेला लोकल गाडीला प्राधान्य देऊन अगोदर सदर लोकल गाडीला कर्जत रेल्वे स्थानकात का आणली गेली नाही? असा प्रश्न पंकज ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे उपस्थित केला आहे.

# मध्य रेल्वेच्या प्रवाशांसाठी नवनवीन सुविधा


**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे आपल्या विभागातील स्थानकांवरील प्रवासी सुविधा आणि सुरक्षा अधिकाधिक सुधारण्यासाठी कटिबद्ध आहे. प्रवाशांना आरामदायी, सुलभ आणि अखंड प्रवासाचा अनुभव मिळावा यासाठी महत्त्वपूर्ण उन्नतीकरणे आणि नवीन सोयी–सुविधांची स्थापना करण्यात आली आहे.

ऑक्टोबर २०२५ महिन्यात मुंबई विभागाने प्रदान केलेल्या सुविधा मध्ये प्रवासी सुविधा डोंबिवली (प्लॅटफॉर्म क्रमांक ३ आणि ४) आणि कुर्ला (प्लॅटफॉर्म क्रमांक ५ आणि ६) या स्थानकांवर प्रत्येकी दोन अशा एकूण दोन एस्कलेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. विविध स्थानकांवर ९२ अतिरिक्त ब्रशलेस डायरेक्ट करंट पंख्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. बीएलडीसी पंखे म्हणजे अशा प्रकारचे पंखे जे ब्रशलेस डीसी मोटरवर चालतात. हे पंखे पारंपरिक इंडक्शन मोटर पंख्यांपेक्षा अधिक ऊर्जा–कार्यक्षम असून कमी आवाज करतात.

कार्बन ब्रशेसऐवजी हे इलेक्ट्रॉनिक कंट्रोलर्स आणि कायमस्वरूपी चुंबकांचा वापर करतात, ज्यामुळे ऊर्जेचा वापर सुमारे ५० ते ७० टक्क्यांनी कमी होतो. विविध स्थानकांवर ३३ नवीन एअर सर्क्युलेटर पंखे बसविण्यात आले आहेत. हे एअर सर्क्युलेटर्स पारंपरिक





पंख्यांप्रमाणे फक्त एका दिशेने हवा न उडवता सतत आणि सर्वदिशांनी समान वायुप्रवाह निर्माण करतात. विविध स्थानकांवर ३८६ एलईडी ट्यूब लाइट्स बसविण्यात आले आहेत. हे एलईडी ट्यूब लाइट्स ऊर्जा–कार्यक्षम असून त्यांचे कालमान (टिकाऊपणा) अधिक आहे तसेच त्याने देखभाल आणि बदलण्याचा खर्चही कमी होतो. हे अधिक उत्तम प्रकाश देतात आणि पर्यावरणपूरक आहेत.

प्रवासी माहिती मध्ये जीपीएस घड्याळे आणि सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली, उरण स्थानकावर एक जीपीएस टॉवर घड्याळ बसविण्यात आले आहे. माटुंगा स्थानकावरील सार्वजनिक उद्घोषणा प्रणालीचे अद्ययावतीकरण करून ती IPA आधारित प्रणाली करण्यात आली आहे, ज्यामध्ये माहिती स्पष्ट आणि अधिक प्रभावीपणे पोहोचण्यासाठी ३५ स्पीकर्सची व्यवस्था आहे.

प्रवासी तिकीट सेवा मध्ये मध्य रेल्वेवर मोबाईल यूटीएस सहाय्यकांची सुविधा सुरू करण्यात आली असून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे तीन सहाय्यक कार्यरत आहेत. मोबाईल फोन आणि कंबरेला बांधता येणारी छोटी तिकीट–प्रिंटिंग मशीन देण्यात आल्यामुळे हे एम–यूटीएस सहाय्यक कॉन्कोर्सवर, होल्डिंग एरियामध्ये किंवा रेल्वे स्थानक परिसरात थांबलेल्या प्रवाशांपर्यंत जाऊन, प्रवासभाडे स्वीकारून तिकिटे तात्काळ जारी करतात.

मध्य रेल्वे स्थानक सुविधांचे उन्नतीकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या सुधारणांचा समावेश करून प्रवाशांचा एकूण प्रवास अनुभव अधिक उत्तम करण्यावर भर दिला जात आहे. सर्व उपक्रम प्रवाशांसाठी अनुकूल अशा रेल्वे जाळ्याच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असून, सुलभता, सोय आणि सुरक्षितता यांना प्राधान्य देतात.

# म्हसाडी, बारपे, महागाव शाळेतील विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कुणबी समाज विद्यालय म्हसाडी, तळा तालुक्यातील बारपे शाळा, महागाव येथील वरदायिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ रोहा यांच्या माध्यमातून प्रेस फ्रेंड ग्रुप यांच्या प्रयत्नातून सायकलींचे वाटप करण्यात आले. शाळा, महाविद्यालयाचे पदाधिकारी शिक्षकवृंदानी रोटरी क्लब ऑफ रोहा, प्रयत्न करणाऱ्या पत्रकारांचे आभार मानले.



व्यासपीठावर रोटरी क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष राजेंद्र पोकळे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख, अमित घाग, रोटरीचे सचिव जयदेव पवार, खजिनदार भूषण लुमण, सतीश महाडीक, विक्रम जैन, डॉ. सुभाष म्हस्के, आशिष दळवी, सलाम रायगड संपादक राजेंद्र जाधव, संस्था चेअरमन नारायण पवार, लक्ष्मण साळवी, जनार्दन ढेबे, पत्रकार महेंद्र मोरे, रवींद्र कान्हेकर, जितेंद्र जाधव, समिधा आष्टीवकर, निलम सावंत, नंदकुमार बामुगडे व ग्रामस्थ, शिक्षकवृंद उपस्थित होते. प्रारंभी म्हसाडी विद्यालयातील चार विद्यार्थ्यांना सायकल वाटप केल्या.

या वेळी चेअरमन नारायण पवार यांनी म्हसाडी विद्यालय अत्यंत जिकरीने सुरू आहे. आदिवासी, ठाकूर, कुणबी समाजातील विद्यार्थी ज्ञानार्जन करतात. इथून शिकून गेलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात नावलौकिक कमावत आहे, विविध संस्था रोटरी क्लबने दिलेली मदत अनमोल आहे, अशी भावना व्यक्त केली.

सामाजिक कार्यकर्ते अमित घाग यांनी दुर्गम भागातील शाळा व विद्यार्थ्यांना आधार देण्याची गरज आहे. त्या दृष्टीने आपणही नेहमीच प्रयत्नशील असतो, यापुढे शैक्षणिक क्षेत्रात मदत मिळविण्यासाठी अधिक प्रयत्न करू असे सांगितले.

रोटरी क्लब ऑफ रोहा संस्थेने पुढाकार घेत विद्यार्थ्यांना सायकली दिल्या याचे समाधान आहे, असे सांगत पत्रकार राजेंद्र जाधव यांनी आपल्या कविता, सामाजिक शैलीतून मुलांशी संवाद साधला. माजी विद्यार्थी जितेंद्र जाधव यांनी माझ्या शाळेला, विद्यार्थ्यांना मदत मिळवता आली. त्यातून शाळेचे ऋण व्यक्त करतो असे सांगितले.

बारपे शाळेला तीन सायकली, वरदायनी विद्यालय विद्यार्थ्यांना सात एकूण १४ सायकलींचे वाटप यावेळी करण्यात आले. ३ शाळेतील विद्यार्थी सायकल वाटप कार्यक्रमाला रोटरी क्लब अध्यक्ष राजेंद्र पोकळे व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाठी विद्यार्थी, शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले.

# प्राजक्ता सागवेकर वक्तृत्व स्पर्धेत प्रथम



**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सहकारी संघ पुणे व भाउसाहेब नेने महाविद्यालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत डॉ. पंतगराव कदम महाविद्यालयाची प्राजक्ता सागवेकर या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. पेणमधील भाउसाहेब नेने महाविद्यालयात हि स्पर्धा १३ नोव्हेंबर रोजी पार पडली.

स्पर्धेचे उदघाटन प्राचार्य डॉ सदानंद धारप व सहकार कार्यालयाचे राजेंद्र ढवळे यांच्या हस्ते पार पडले. अनेक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. प्राजक्ता सागवेकर या विद्यार्थीनीने सहकार चळवळीतून ग्रामीण विकास या विषयावर भाष्य केले. प्राजक्ताच्या या यशाबद्दल श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष अभय कुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरलीधर वाघ यांनी तिचे अभिनंदन केले. परीक्षक म्हणून डॉ. बामणे व ढवळे यांनी काम पाहिले. प्राचार्य डॉ विनायक पवार, प्राचार्य डॉ अनिल वळवी, प्राचार्य हिरामण टोंगारे यांचे तिला मार्गदर्शन लाभले.





**अलिबाग : वरसोली यात्रेनिमित्त अनेक भाविकांनी विठोबा रखुमाईचे दर्शन घेतले.**

# पोलादपूर अंगणवाडीमध्ये बाल दिन उत्साहात साजरा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत पोलादपूर नगरपंचायत बाजारपेठ हद्दीतील अंगणवाडीमध्ये १४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्यात आली.

अंगणवाडी सेविका आरती मनिष पाटणे आणि अंगणवाडी मदतनीस रूपाली सुनील गायकवाड यांनी अंगणवाडीतील बालक–बालिकांना गीत व कविता वाचन, नृत्य सादरीकरण, बालगीत, छान



छान गोष्टी, चित्र रंगविणे अशा विविध उपक्रमांनंतर खाऊ वाटप करीत आनंद साजरा केला. या वेळी पंडीत नेहरू यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येऊन पालकांच्या सहकार्याने बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कूलची माऊली वृद्धाश्रमाला भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या युनायटेड एज्युकेशन अँड ट्रस्ट संचालित युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा या शाळेने तालुक्यातील बोरवाडी येथील माऊली वृध्दाश्रमाला भेट देऊन या शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील वृद्धांचा दैनंदिन जीवनातील प्रवास आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात हे वृद्ध लोक व्यतित करीत असलेले जीवन याबाबत त्यांच्याशी संवाद साधून मनोरंजनात्मक खेळ खेळून अशा एका आगळ्यावेगळ्या अनुभवाचा मनमुराद आनंद घेतला.

या शाळेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर अधिकतम लक्ष केंद्रित केले असून हि शाळा अशाप्रकारचे विविध नाविन्यपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना देऊन चांगले हुशार व दर्जेदार विद्यार्थी घडविण्याचा शाळेचा मानस आहे.

ज्या लोकांना वृद्धापकाळात कोणाचा आधार नसतो असे लोक वृद्धापश्रमात आपले जीवन व्यतीत करीत असतात.





या लोकांचे जीवन कशाप्रकारचे असते याची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी या उद्देशाने युनायटेड इंग्लिश स्कूल मोर्बा या शाळेने बोरवाडी येथील माऊली वृध्दाश्रमाला भेट दिली. त्यावेळी या शाळेच्या मुख्याध्यापिका झोया बडे, शाळेचे शिक्षक वफा गैबी, फायझा मुल्ला, अक्षय पवार, रतिका गमरे व शाळेतील इयत्ता सातवी, आठवी व नववीतील विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींशी संवाद सांधला. यावेळी वृद्धापश्रमातील व्यक्तींनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांसमवेत आपल्या आयुष्याची कहाणी कथन केली.

शाळेच्या विद्यार्थ्यांनी बनविलेले ग्रिटिंग कार्ड वृद्ध व्यक्तींना भेट देण्यात येऊन वृध्दाश्रमाला झाडे लावा, झाडे जगवा संदेश देत एक बदामाचे वृक्ष शाळेतर्फे भेट देण्यात आले. या वृद्धाश्रमातील वृद्धांसमवेत तीन तासांच्या भेटीत मनोरंजनात्मक खेळाबरोबरच शाळेने आणलेले ग्रिटिंगमधील देशातील कुतुबमिनार, ताजमहल यांसारखी अनेक प्रसिद्ध पर्यटन स्थळे तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग, विराट कोहली, रोहित शर्मा, कपिल देव, सुनील गावस्कर, महेंद्रसिंग धोनी यांचे छायाचित्र ओळखायला लावून त्यातूनही या शाळेने वृद्ध व्यक्तींमध्ये निखळ असा आनंद घेतला.

या शाळेने आपल्या भेटीत वृद्ध व्यक्तींना आपल्या कुटुंबातीलच या व्यक्ती आहेत असे समजून भरपूर प्रेम दिल्याने शाळेने निरोप घेताना या वृद्ध व्यक्तींच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. या क्षणाने शाळेचे सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचेही आश्रू पाण्याने भरून पुन्हा आम्ही जरूर आपल्या सर्वांना भेटायला येऊ असे सांगत निरोप घेतला.

# रेवदंड्यातील रो–रो जेट्टीतील समस्या दूर करण्याची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्र खाडीत उत्तरेस महाराष्ट्र सागरी मंडळाचे वतीने जलवाहतुक रो.रो. जेट्टी नव्याने बांधण्याचे काम चालु होत आहे, या जलवाहतुक रो.रो. जेट्टीस कोळी बांधवाचा विरोध आहे, त्याबाबतचे निवेदन पत्र दर्यातंरग सागरी मच्छीमार वि.का.स.संस्था मर्यादीत रेवदंडा–चौल यांचे वतीने महाराष्ट्र सागरी मंडळास देण्यात आले आहे.

रेवदंड्यात सागरी जलवाहतुकीसाठी रो. रो. जेट्टी शासनाचे वतीने बांधण्यात येत आहे. सदर ठिकाण रेवदंडा समुद्र खाडीत साकगरी मच्छीमार वि.का.स.संस्था मर्यादीत रेवदंडा–चौल या संस्थेचे कार्यक्षेत्रात असून जलवाहतुक रो.रो. जेट्टी कुंडलिका नदीच्या दक्षिणेस व रेवदंडा–साळाव पुलाच्या पश्चिमेस बांधण्यात येत आहे. या जलवाहतुक रो.रो. जेट्टीस स्थानिक कोळी बांधवाचा विरोध असून तसे पत्र महाराष्ट्र सागरी मंडळास दर्यातंरग सागरी मच्छीमार वि.का.स.संस्था मर्यादीत रेवदंडा–चौल यांनी दिले आहे. शिवाय या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, प्रादेशिक बंदर अधिकारी, रेवदंडा सागरी मंडळ बंदर अधिकारी यांना दिले आहे.

ही जलवाहतूक रो.रो. जेट्टी बांधल्याने स्थानिक मच्छीमाराचे मच्छी उतरविणे, जाळी उतरविणे, तसेच जेट्टीच्या समोरील जाळी बांधण्याचे ठिकाण कायमस्वरूपी नष्ट होणार आहे, तसेच रेवदंडा–कोर्लईच्या चॅनेलमधून रो.रो. नौका येताना व जाताना, मच्छीमारांचा जाळीचे नुकसार होणार आहे. तेव्हा सदर समस्येचा विचार करून संबधीत खात्याचे अधिकारी व ठेकेदार व संस्थेची सयुक्त सभा घेण्यात यावी. शिवाय स्थानिक मच्छीमार बांधवाना प्रकल्पग्रस्त म्हणून घोषीत करण्यात यावे व शासनाने होणारी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी या निवेदनपत्रामध्ये दर्यातंरग सागरी मच्छीमार वि.का.स.संस्था मर्यादीत रेवदंडा–चौल यांचे वतीने करण्यात आली आहे.

एकदंरीत विकासकामाला विरोध नाही, परंतू समस्यांचा विचार जरूर करावा, दुर करव्यात असे म्हटले आहे. या निवेदन पत्राची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेदण्याचा इशारा दर्यातंरग सागरी मच्छीमार वि.का.स.संस्था मर्यादीत रेवदंडा–चौल यांचे वतीने देण्यात आला आहे.

# आरपीएलच्या अंतिम लढतींचा थरार

## रेवल विनर्स, प्राईम दादा इलेव्हन, बाश्री ब्लास्टर्स संघ विजेते







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड वॉरियर्स आयोजित रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी यांच्या सहकार्याने आणि ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. पुरस्कृत रोटरी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या पाचव्या सत्रातील अंतिम फेरीचे सामने रविवारी (दि. १६) नवीन पनवेलच्या वेंगसरकर अकॅडमी येथे खेळविण्यात आले. या स्पर्धेत तीन वेगवेगळ्या चषकांसाठी अंतिम लढती झाल्या, ज्यात रेवल विनर्स, प्राईम दादा इलेव्हन आणि बाश्री ब्लास्टर्स या संघांनी विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी त्यांनी विजेते संघ व खेळाडूंचे अभिनंदन केले तसेच पनवेलमधील इतर खेळाडूंसाठी अशा स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. असे प्रतिपादन केले. दरम्यान, स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

बक्षीस वितरण समारंभास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष अनिल ठकेकर, रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीचे अध्यक्ष डॉ. रोहित जाधव, भारत विकास परिषदेचे अध्यक्ष कमांडर जांभेकर, रोटरी प्रांत ३१३१चे माजी स्पोर्ट्स संचालक संतोष घोडिंदे, गणेश कडू यांच्यासह रायगड वॉरियर्सचे पदाधिकारी, सर्व टीमचे मालक, खेळाडू आणि प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सर्व महापालिका अधिकारी, स्पर्धा आयोजक, मैदानावरील कर्मचारी आणि सहभागी खेळाडूंचे आभार मानून स्पर्धेची सांगता केली.




# अस्मिता खेलो इंडिया वूमन्स किकबॉक्सिंग लीग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात अस्मिता खेलो इंडिया वूमन्स लीग या किकबॉक्सिंग स्पर्धेचे रविवारी (दि. १६) आयोजन करण्यात आले होते. किकबॉक्सिंगचे प्रशिक्षण मुलींसाठी आत्मसंरक्षण आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन करत पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महिला किकबॉक्सिंगसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

या स्पर्धेत पनवेल, रायगड, नवी मुंबई, ठाणे आणि पालघर यांसारख्या विविध जिल्ह्यांतून एकूण ३४२ खेळाडू सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेचे उद्घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि वाको महाराष्ट्र किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष निलेश शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन समारंभास माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, समीर ठाकूर, दिलीप पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, भाजपचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम आदी उपस्थित होते. अशा स्पर्धांमुळे मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये निश्चितच सकारात्मक फरक पडेल, असा विश्वास या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला.

# सुभाष पाटील यांचे तायक्कॉन्डो पंच परीक्षेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मतासफा इस्वातीनी देशातील इसीबयेनी रिसॉट येथे नुकत्याच झालेल्या १५४व्या आंतरराष्ट्रीय क्युरूगी व पारा तायक्कॉन्डो पंच परीक्षेत रायगड व नवी मुंबईचे आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुभाष पाटील यांनी यश संपादन केले. त्यांनी भारतातून एकमेव सहभाग नोंदविला होता.

या आंतरराष्ट्रीय परीक्षा सेमिनारमधून सुभाष पाटील यांना पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक स्पर्धांचे नवीन नियम व पारा (दिव्यांगांची स्पर्धा) कशा पद्धतीने घेतात त्याचे नियम शिकवण्यात आले. या पंच परीक्षेत पाटील यांची लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, शारीरिक परीक्षा व पॉइंट कशा



प्रकारे द्यायचे या चाचण्या घेण्यात आल्या. या सर्व चाचण्या ते उत्तीर्ण झाले. त्यांना इटलीतील पंच परीक्षक ब्रुनो ब्रुगाननो व वर्ल्ड तायक्कॉन्डो पारा आंतरराष्ट्रीय कमिटीचे अध्यक्ष उस्मान दिलदार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

सुभाष पाटील यांनी अनेक देशात जाऊन आंतरराष्ट्रीय रीफ्रेशर पंच परीक्षा दिल्या व जागतिक तायक्कॉन्डो स्पर्धेत पंच म्हणून काम पाहिले आहे. नवीन सर्व नियम भारतातील पंचांना शिकवून येथे चांगले आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

सुभाष पाटील यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल तायक्कॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया, तायक्कॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व रायगडचे पदाधिकारी, नवी मुंबई-रायगडचे मान्यवर व विशेषकरून आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महाालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले.

# कुमार संगकारा पुन्हा राजस्थान रॉयल्सचा कोच

**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने आगामी हंगामासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. राजस्थान रॉयल्समधील राहुल द्रविड यांचा कोचिंग कार्यकाळ हा अवघ्या एका महिन्यात संपला आहे. राजस्थान रॉयल्सने आपला पूर्वीची विश्वासू कोच कुमार संगकाराकडे पुन्हा एकदा प्रशिक्षकपदाची सूत्रे सोपवली आहेत.

आता आयपीएल २०२६च्या हंगामात कुमार संगकारा हा राजस्थान रॉयल्सचा कोच असणार आहे. त्याच्याकडे ही



अतिरिक्त जबाबदारी असणार आहे. तो संघाचा क्रिकेट संचालक म्हणूनदेखील काम पाहतो. गेल्या हंगामात राजस्थान रॉयल्सची कामगिरी खराब झाली होती. ते नवव्या स्थानावर राहिले होते.

संगकाराने राजस्थान रॉयल्सचे २०२१ ते २०२४ असे प्रशिक्षकपद सांभाळले होते. त्याच्या मार्गदर्शनाखाली राजस्थान आयपीएल २०२२च्या अंतिम फेरीत धडक मारली होती, तर २०२४च्या हंगामात प्ले ऑफमध्ये प्रवेश केला होता, मात्र २०२५मध्ये कामगिरीत सातत्य राखण्यात राजस्थानला अपयश आले. राहुल द्रविडने २०२५मध्ये राजस्थानचे प्रशिक्षकपद भूषवले होते. त्यांनी नवीन हंगामापूर्वी कोचपदाचा राजीनामा दिला.

राजस्थान रॉयल्सचे सहमालक मनोज बडले यांनी, कुमार संगकारा कोच म्हणून परतल्याचा आनंद असल्याचे सांगितले. ते म्हणाले, संघाला आता काय गरजेचे आहे हे त्यांना माहिती आहे. त्यांनी यापूर्वी संघासोबत काम केले आहे. त्यांना राजस्थान रॉयल्सचे कल्चर माहिती आहे. ते संघात स्थैर्य आणि समतोल आणतील. संगकारा हे आमचे कायमचे विश्वासू नेतृत्व राहिले आहे. त्यांचा शांत स्वभाव, स्पष्टता आणि क्रिकेटमधील हुशारी पुढच्या टप्प्यात एक महत्वाचे योगदान ठरेल.

# एकही धाव न देता पाच विकेट्स!

## रणजी ट्रॉफीत अमित शुक्लाची भेदक गोलंदाजी



**रोहतक : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफी सामन्यात सर्विसेसचा गोलंदाज अमित शुक्लाच्या गोलंदाजीने खळबळ उडवून दिली आहे. हरियाणाविरुद्ध अमितने पहिल्या डावात फक्त २७ धावा देऊन आठ बळी घेतले. विशेष म्हणजे यामध्ये अमितने एकही धाव न देता तब्बल पाच विकेट्स घेतल्या.

अमित शुक्लाच्या या भेदक गोलंदाजीच्या बळावर सर्विसेसने हरियाणाला १११ धावांवर सर्वबाद केले. सर्व्हिसेसला ९४ धावांची आघाडी मिळाली, ज्यांचा संघ फक्त २०५ धावांवर बाद झाला. अमितने पाच षटकांत पाच विकेट्स घेतल्या आणि यादरम्यान त्याने एकही धाव दिली नाही.

अमित शुक्लाने दुसऱ्याच चेंडूवर हरियाणाला अडचणीत टाकले. त्याने प्रथम सलामीवीर युवराज सिंगला एका धावेवर बाद केले. त्यानंतर त्याने मयंक शांडिल्य, यशवर्धन दलाल, धीरू सिंग आणि निखिल कश्यप यांचे बळी घेतले. त्यानंतर अमितने आणखी तीन विकेट्स घेतल्या. यात कपिल हुडा, पार्थ शिव आणि अंशुल कंबोज यांचा समावेश होता.

# शुबमन गिलला डिस्चार्ज

## दुसऱ्या कसोटीत सहभाग अनिश्चित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा कसोटी कर्णधार शुबमन गिलला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात झालेल्या मानेच्या दुखापतीमुळे कोलकात्याच्या रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे, परंतु गुवाहाटी येथे शनिवारपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी तो तंदुरूस्त होईल की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

भारताचे प्रशिक्षण सत्र मंगळवारी सकाळी कोलकाता येथे होणार आहे, पण गिल सहभागी होण्याची अपेक्षा नाही. संघ बुधवारी गुवाहाटीला जाईल, परंतु गिलला मानेच्या समस्येतून बरे होत असताना



डॉक्टरांनी त्याला व्यावसायिक विमान उड्डाणे टाळण्याचा सल्ला दिला असल्याने तो संघासोबत प्रवास करण्याची शक्यता कमी आहे, असे वृत्तसंस्था एनएनआयने म्हटले आहे.

ईडन गार्डन्स येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी गिल फलंदाजीसाठी आला आणि सायमन हार्मरच्या गोलंदाजीवर त्याने चौकार मारण्यासाठी स्वीप शॉट मारला, परंतु लगेचच त्याच्या मानेला दुखापत झाल्याने वेदना जाणवू लागल्या. फिजिओने त्याला मैदानाबाहेर नेले आणि दुसऱ्या डावात तो फलंदाजीला परतला नाही. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) पुष्टी केली की तो त्या सामन्यात पुढे खेळणार नाही.

यानंतर गिलला रुग्णालयात नेण्यात आले. सुरुवातीच्या अहवालात असे म्हटले होते की, तो निरीक्षणासाठी आयसीयूमध्ये होता आणि न्यूरोलॉजी आणि ऑर्थोपेडिक तज्ज्ञांचा समावेश असलेले एक वैद्यकीय मंडळ स्थापन करण्यात आले. १६ नोव्हेंबर रोजी त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आणि तो कोलकाता येथील टीम हॉटेलमध्ये परतला.

दुखापत ही मानेच्या स्नायूंना झालेली असल्याने बरे होण्यासाठी तुलनेने कमी वेळ लागू शकतो, परंतु वेळापत्रकानुसार वेळ कमी आहे. शिवाय खेळाडूसाठी विशेषतः कसोटी सामन्यातील कर्णधार जो दीर्घ सत्रांसाठी फलंदाजी करतो आणि नेतृत्व करतो, त्याला खेळण्यासाठी पूर्णपणे वेदनारहित, गतिमान आणि आत्मविश्वासू असणे आवश्यक आहे. पुढील कसोटी फक्त सहा दिवसांनी असल्याने तोपर्यंत तो पूर्णपणे तंदुरूस्त होण्याची शक्यता कमी आहे.

# भारतीय संघाच्या पराभवानंतर चेतेश्वर पुजारा संतापला!

**कोलकाता : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा संघ भारत दौऱ्यावर आहे. दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच कसोटीत भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. भारतीय संघाकडे हा सामना जिंकण्याची सोपी संधी होती, पण फलंदाजांच्या फ्लॉप शो मुळे हातचा सामना निसटला. या पराभवानंतर भारताचा माजी क्रिकेटपटू चेतेश्वर पुजाराने संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर चेतेश्वर पुजारा सध्या समालोचकाची भूमिका बजावत आहे. भारतीय संघाच्या पराभवानंतर स्टार स्पोर्ट्सवर बोलताना पुजारा म्हणाला, भारतीय संघाचा ऑस्ट्रेलिया किंवा इंग्लंडमध्ये पराभव झाला, तर ते आपण समजू शकतो, कारण भारतीय संघ संक्रमणाच्या टप्प्यातून जात आहे, पण यामुळे भारतातच पराभव होतोय, हे पचवणे जरा कठीण आहे.

तुम्ही सर्व खेळाडूंचा प्रथम श्रेणी क्रिकेटमधील रेकॉर्ड काढून पाहा, जसे की यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, वॉशिंग्टन सुंदर, शुबमन गिल आणि सर्वच खेळाडू. या सर्व खेळाडूंचा मायदेशातील रेकॉर्ड दमदार आहे. तरीदेखील आपण हरतोय, म्हणजे नक्कीच काहीतरी गडबड आहे. हा सामना चांगल्या खेळपट्टीवर खेळवण्यात आला असता, तर निकाल वेगळा लागू शकला असता, असे पुजाराने नमूद केले.

# भारत-पाकिस्तान सामन्यात एका कॅचमुळे वाद

**दोहा : वृत्तसंस्था**

आशिया चषक रायझिंग स्टार २०२५ स्पर्धेत भारत अ आणि पाकिस्तान शाहीन्स यांच्यातील सामन्यात टीम इंडियाला पराभव पत्करावा लागला. पाकिस्तानी संघाने १३.२ षटकांत भारतीय संघाचा आठ गडी राखून पराभव केला. या सामन्यात पंचांनी घेतलेल्या निर्णयावरून गदारोळ झालेला पहायला मिळाला.




प्रथम फलंदाजी करताना भारत अ संघाने १३६ धावा केल्या. पाकिस्तानकडून डावाची सुरुवात करताना माज सदाकतने संघाला धमाकेदार सुरुवात करून दिली. त्याने ३१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याच्या अर्धशतकानंतर वैभव सूर्यवंशीने त्याचा एक सोपा झेल सोडला आणि त्याला जीवदान मिळाल. यानंतर सुयश शर्माच्या चेंडूवर तो झेलबाद झाला, पण तिसऱ्या पंचांनी त्याला नाबाद दिले. यावरून मोठा वाद झाला.

दहाव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर सदाकत झेलबाद झाला. यावेळी लाँग-ऑनवर असलेल्या नेहल वधेराने सीमारेषेजवळ झेल घेतला, पण सीमारेषा ओलांडण्यापूर्वीच त्याने तो चेंडू दुसऱ्या क्षेत्ररक्षकाकडे फेकला आणि झेल पूर्ण केला. भारतीय अ संघासह सर्वांनाच वाटले की सदाकत झेलबाद झाला. सादाकत मैदानाबाहेर गेला आणि नवा फलंदाजही मैदानावर आला.

दरम्यान, अनेक वेळा रिप्ले पाहिल्यानंतर हे स्पष्ट झाले की वधेराने सीमारेषेला स्पर्श न करता चेंडू दुसऱ्या क्षेत्ररक्षकाकडे वेळेत फेकला होता. तो स्पष्टपणे बाद असल्याचे दिसून आले, मात्र तिसऱ्या पंचांनी त्याला नाबाद दिले. हे पाहून भारतीय खेळाडूंनी पंचांना घेरले आणि निर्णयावर प्रश्न विचारण्यास सुरुवात केली, तर भारतीय प्रशिक्षकांनीही चौथ्या पंचांशी निर्णयावर चर्चा सुरू केली.

नेहल वधेराने नमन धीरकडे वेळेत चेंडू टाकला होता, परंतु दुसऱ्या खेळाडूने झेल घेण्यापूर्वी नेहाल वधेरा स्वतः सीमारेषेच्या आत परतला नाही. नमनने जेव्हा झेल टिपला तेव्हा तो सीमारेषेबाहेर होता. परिणामी पंचांनी फलंदाजाला नाबाद घोषित केले. याचा फायदा पाकिस्तानला झाला आणि भारताचं मात्र नुकसान झाले, पण पंचांनीही हा निर्णय देताना चूक केली, नाबाद दिल्यानंतर त्यांनी चौकार न देता तो डॉट बॉल दिला.

**असा अहे नवा नियम**

*जून २०२५मध्ये आयसीसीने नवीन वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप सायकलसह बाउंड्री कॅचशी संबंधित नियमांमध्ये तीन बदल केले आणि 'रिले कॅच'शी संबंधित तिसरा नियम येथे लागू झाला. यानुसार जर एखाद्या क्षेत्ररक्षकाने चेंडू सीमा ओलांडण्यापूर्वी दुसऱ्या क्षेत्ररक्षकाकडे चेंडू फेकला, तर चेंडू डेड होण्यापूर्वी त्या क्षेत्ररक्षकालाही सीमारेषेच्या आत परत यावे लागेल, तरच तो झेल मानला जाईल. असे नसल्यास पंच चौकार व षटकार देतील.*

नामांकित कंपनीसाठी खालील जागा भरणे आहे

| | |
|---|---|
| सिव्हील इंजिनिअर (RMC) | -1 |
| अकाऊंट असिस्टंट | -1 |
| सुपरवायजर | -1 |
| ड्रायव्हर (LMV) | -1 |

वरिल पदासाठी किमान 1 ते 2 वर्षे अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

संपर्कासाठी :- 8879595974

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com